अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ११ / २००८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०७ -०३ -२००८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

सभा सुचना क्रमांक ११ , दिनांक १५ - ०३- २००८.

प्रति,

सन्मा.श्री. / श्रीमती......................................................

सदस्य / सदस्या, प्रभाग क्रमांक ...............

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १५-०३-२००८ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.
३. दि.१०-१०-२००७ चे इतिवृत्त.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सभा क्रमांक ११ दिनांक १५ - ०३- २००८ रोजी दु.१.०० वां होणा-या सभेची विषय पत्रिका.

**-- *--**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १ | मागील दिनांक १०-१०-२००७ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव. |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या नविपेठ दवाखाना येथील प्रयोगशाळेमध्ये सेमी ॲटो ॲनालायझर मशिनवर करावयाच्या नविन तपासण्या व त्यांचे दर अखेर मंजुरीसाठी मा.महासभेपुढे निर्णयास्तव ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | प्रभाग क्र.२१ मधील कै.उ.रा.बोगावत मार्गावरील बालाजी मंदिर परिसरात श्री. बालाजी मंदिर चौक व संगम चौक ते धरती चौक दरम्यान रस्त्यास महावीर प्रभुजी मार्ग असे नामकरण करणे बाबत मा.श्री.बोरा किशोरकुमार , नगरसेवक, श्री.संजय चोपडा , नगरसेवक , श्रीमती.मंगल गुंदेचा , नगरसेविका यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | एकात्मिक शहर विकास योजना, अहमदनगर (सुधारित ) सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुकाने / गाळे / कार्यालये / भाजीचे ओटे यांचे भाडेमूल्य ठरविणे बाबत ऑफिसचा रिपोर्ट. |
| ६ | महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अनधिकृत व नियमबाहय बांधकामे दंड / प्रशमन शुल्क आकारून नियमित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ७ | श्री.किसन शिवाजी भांगरे, मलेरिया बिगारी यांनी त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ प्रमाणे केलेल्या शिक्षेविरूध्द केलेल्या अर्जावर ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव |
| ८ | श्री.काशीनाथ नारायण धिंदले , मलेरिया बिगारी यांनी त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ प्रमाणे केलेल्या शिक्षेविरूध्द केलेल्या अर्जावर ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव |
| ९ | दि.७-१२-२००६ चे शासन निर्णयानुसार सिस्टीम मॅनेजर व संगणक प्रोग्रॅमर या पदावर पदोन्नती देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १० | अहमदनगर महानगरपालिका सि.स.नं. १००/१ औरंगाबाद रोड येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे, सुधारित नकाशे व आराखडे , सुधारित किंमत यांना मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११ | आस्थापना कायम सुचीवरील कनिष्ठ अभियंता / सहाय्यक नगररचनाकार ही पदे खुल्या / अनुशेषांतर्गत सरळसेवेने भरती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : ०७-०३-२००८.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : १५-०३-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : मागील दिनांक १०-१०-२००७ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : मागील दि.१०-१०-२००७, रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविले.

-- * --

चर्चा :

मा.श्री.कावरे - कर्मचारी कामावर असतांना मृत्यु झाल्यास त्याबाबत तरतूद काय आहे ? कर्मचा-यांस किमान ५ लाख रु. मिळाले पाहिजेत त्यासाठी काय केले पाहिजे. पुलगम यांचेसाठी अनुकंपा तत्वानुसार त्यांच्या फॅमिलीमध्ये एकाला नौकरी दिली पाहिजे.

मा.उपायुक्त - दैनंदिन कामगार शिडीवरुन पडुन मृत्यु ? तो न्यायालयीन कर्मचारी असल्याने वारस लावता येणार नाही. नविन भरती मध्ये त्यांचे वारसासाठी प्रयत्न करु. नियमाप्रमाणे देय रक्कम देवू.

मा.श्री.जाधव - विठठलराव येमूल पद्मसाळी समाजाचे कारभारी होते. त्यांची अपरिमित हानी झाली आहे. पुलगम बिगारी असुन देखिल वायरमनचे काम त्यांना दिले कसे. कायद्यावर बोट ठेवू नका. कोणाचीही बाजू झटकून टाकू नका. पोलवर पाठवणे बाबतचे पुरावे दाखवावे.

मा.श्री.नज्जु पहेलवान - पालिकेचे अधिकारी मदत करणार का नाही. कर्मचा-यांनी कोणाच्या भरवशावर काम करायचे, ड्युटीवर असलेल्या कामावरील कर्मचारी यांचे बाबत कोणी जबाबदारी घ्यावयाची.

मा.श्री.गिरवले - पाणी पुरवठ्यात पाईप वापरल्याने पाणी प्रश्न सुटेल. संबंधित अधिकारी यांना आदेश देवुन गॅरेज व इतरत्र पडलेले पाईप आहेत त्यांचा योग्य वापर करुन त्यामुळे पाणी प्रश्न सुटेल.

मा.उपमहापौर - प्रत्यक्ष साईट बघा श्री. पालवे.

मा.श्री.कानडे - चार पाईप पडलेले आहेत. त्यांचा काही उपयोग नाही तेथील पाईप उचलून ते योग्य ठिकाणी वापरावेत.

मा.महापौर - त्या पाईपांची गरज नव्हती काय ? त्याबाबतची फाईल मागवा. त्याशिवाय सत्य कळणार नाही.

मा.श्री.घुले - दोन तास जी चर्चा झाली, महापौरांचे निवेदन दलित वस्तीबाबतच्या इतिहासाची परंपरा, महानगरपालिका कोर्ट कचे-या, २००३ मध्ये महानगरपालिकेत रुपांतर सुरुवातीस भगवानराव फुलसौंदर, महापौर व नंतर संदीप कोतकर, महापौर, विकासासाठी अभिनंदन, दोन रस्त्यांची कामे पुर्ण झाली ठेकेदाराचे काम पुर्ण निविदापुर्वी ठेकेदारांनी जी जनतेच्या दृष्टीने कामे केली आहेत ती अयोग्य आहेत. ठेकेदारांची दादागिरी चालणार नाही. मा.श्री.जोशी - टेंडर कुणी पळवले याबाबत मागील सभेत उत्तर देणार होता त्याचे काय झाले ते समजले नाही.

मा.श्री.घुले - याबाबत दैनिक सकाळमध्येच वाचल्यानंतर समजले आहे.

मा.उपायुक्त - प्रशासनातर्फे खुलासा करण्यांत आला की, अभियंता पाठवुन टेंडर प्रक्रीया स्थगित केली आहे.

मा.श्री.घुले - गोंधळाने ऐकु आले नाही.

मा.उपमहापौर - काम केलेले आहे ते तसेच ठेवण्यांत यावे. त्यांचा सत्कार करण्यांत यावा. बिल अदा करण्यांत येवु नये. देणगी दिली आहे असे समजावे.

मा.श्री.आगरकर - सदर काम करुन घेणे विशेष नाही परंतु याबाबत कामास गृहीत मंजुरी घेवुन कामे केली आहे किंवा कसे प्रशासनातर्फे खुलासा केलेला नाही. याबाबत चौकशी करावी पुर्ण छडा लावावा व त्याबाबतचे बिल काढण्यांत येवु नये.

मा.श्री.गिरवले - या कामाचे उद्‌घाटन मा.महापौर यांनी केले होते काय.

मा.श्री.जाधव - मंजूरी गृहीत धरुन कामे यापुर्वी केलेली आहेत. त्यावर कारवाई करणे असा भाग होत नाही. त्यामुळे यामध्ये महानगरपालिका अधिकारी कमजोर वगैरे नाहीत तसेच निराशही नाहीत तसेच याकामी काही भ्रष्टाचार झाला असेही नाही. परंतु या जनतेच्या कामाबाबत प्रशासनानेच खुलासा करणे व उत्तर देणे आवश्यक होते.

मा.श्री.घुले - या कामाबाबत काय गौडबंगाल आहे, व कोण ठेकेदार आहे. याबाबत ठेकेदारास काय शिक्षा दिली आहे. किंवा काळया यादीत टाकले आहे काय याबाबत खुलासा करावा.

मा.श्री.भानुदास कोतकर - याबाबत विशेष चर्चा झालेली आहे. जनतेच्या हिताच्या दृष्टीकोनातुन मा.महापौर यांनीच सदरचे काम चालु करण्यांस सांगितले होते. तथापि हा चर्चेचा विषय होवु शकत नाही.

मा.श्री.आगरकर - कोणतेही काम सांगणे हा विषय येथे नाही. परंतु कामास गृहीत मंजुरी दिलेली आहे असा खुलासा प्रशासनाकडुन आलेला नाही. याबाबत आयुक्त यांचेकडुन मंजुरी घेतली असती तर समजु शकले असतो. याबाबत प्रोसिजर गुंडाळुन टाकावयाची आहे काय.

मा.श्री.जाधव - मंजुरी गृहीत धरुनच कामे केलेली आहेत. या बाबत ठेकेदारांचा काहीच गुन्हा नाही. तथापि याबाबत कमजोर अधिकारी आणि निराश कर्मचारी अशी महानगरपालिकेची अवस्था आहे.

श्री. शेख मुदस्सर अहमद इसहाक,नगरसेवक यांनी सभेपुढे पत्र देवून वाढीव हद्दीतील कर्मचारी श्री. सय्यद मोहम्मद अली शकील यांची नेमणुक तालीम मास्तर म्हणून तत्कालीन ग्रामपंचायत कालावधीत वर्ग ३ मध्ये नेमणुक करण्यात आली होती. परंतु मा.शासनाकडे माहिती बाबत पत्र व्यवहार करताना वर्ग ४ मध्ये पद दर्शविण्यात आले आहे. अशा बाबत श्री.शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी पत्राद्वारे कळविले आहे. तरी त्यांचे यादी बाबत नियमानुसार व कायदेशीरदृष्टया प्रकरण छाननी करून नंतरच पुढील उचित कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- १ -

मा.श्री.दिप चव्हाण - मागील विषय क्रमांक ४ अत्योंदय योजना लाभार्थींची मंजुरी देणे बाबत फेर सर्व्हे करणे बाबत. कुठपर्यंत कार्यवाही आली याचा खुलासा करावा.

यावर श्री.वैद्य नेरोयो प्रमुख यांनी खुलासा केला.

मा.श्री.अशोक कानडे - लाभार्थींची यादी करतांना २९६ लाभार्थीची निवड करण्यांत आली मात्र १०७ यांच्या ऐवजी नव्याने लाभार्थी यांची निवड करुन यादी सोबत सादर केली होती. याबाबत फेरसर्व्हे करुन यादी करण्यांत यावी व फेरसर्व्हे करण्यांस मान्यता दिली होती तथापि जिल्हा कार्यालयाकडुन यादी प्राप्त झालेली नाही.

मा.श्री.दिप चव्हाण - याबाबतचा प्रश्न जिल्हा कार्यालयाशी निगडीत असल्याने महानगरपालिका ठरावाव्दारे रुलिंग काही दिले तरी ते त्यांना लागु होत नाही. शासन निर्णया प्रमाणे मंजुरी देण्यांत यावी.

उपायुक्त यांनी खुलासा केला की, मा.सदस्य यांच्या सुचनेप्रमाणे फेरसर्व्हे करणे बाबत सुचविले आहे. व त्याप्रमाणे मंजुरी द्यावी लागणार आहे असे सांगितले.

उपमहापौर यांनी सुचविले की, सध्याचे यादीस मंजुरी द्यावी व फेरसर्व्हे करणे करीता विनंती करावी.

त्यावर महापौर यांनी अशी विनंती करुन असे सांगितले.

मा.श्री.दिप चव्हाण - मागील मिटींग मधील प्रस्ताव क्रमांक ६ चे काय झाले.

मा.महापौर - यांनी खुलासा केला.

मा.श्री.दिप चव्हाण- अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी यांची पोस्ट रिक्त आहे. ती भरण्या बाबत काय कार्यवाही केली व करण्यांत येत आहे. त्याची माहिती द्यावी. तसेच सदरची पोस्ट भरेपर्यंत सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा. फेरसादर झाल्यानंतर हा विषय कन्फरमेशनला घेण्यांत यावा.

प्रभारी आयुक्त - वैद्यकीय अधिकारी यांचे पद रिक्त आहे. सदरचे पद भरलेले नाही शासनाकडे पाठपुरावा केलेला आहे. आरोग्य अधिकारी (डॉ.कुलकर्णी ) यांचे पद न्यायप्रविष्ठ असल्याने व त्याचा निकाल लागलेला नसल्याने त्याबाबत कार्यवाही करु शकत नाही.

मा.श्री.आगरकर - जन्म मृत्यु विभागाची माहिती डॉ.कुलकर्णी यांना असल्यामुळे त्यांच्याकडे सदरचा विभाग सोपवावा असे सुचविले.

मा.आयुक्त साहेब मार्च एण्ड पर्यंत रजेवर आहेत महानगरपालिकेचे बजेट मंजुर झालेले असतांना व आर्थिक वर्ष संपण्यास १५ दिवस उरलेले असतांना चालु आर्थिक वर्षांचे टारगेट पुर्ण होणार आहे काय. या बाबत आयुक्त यांची जबाबदारी नाही काय ? त्यांनी रजा वाढविली आहे काय ?

मा.श्री. जाधव - कनिष्ठ अधिकारी यांना चार्ज द्यावयास पाहिजे. त्याबाबत ठराव करावा व तसे शासनास कळवावे.

प्रभारी आयुक्त - आयुक्त यांनी किती दिवस रजा घ्यावी हे सांगु शकत नाही. दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी माझेकडेस चार्ज दिलेला आहे. व आजच्या बैठकीपुरते मला प्राधिकृत केलेले आहे.

मा. महापौर - आयुक्त यांच्या रजेबाबत खुलासा केला.

मा.श्री.अनंत जोशी - मागील सभेच्या विषय क्रमांक ७ बाबत उपविधी बाबत विषय उपस्थित केला असता मा.महापौर यांनी सांगितले की, सदर बाबत १० एप्रिल २००८ पर्यंत मुदत देण्यांत येत आहे.

मा.श्री.जोशी - महानगरपालिकेमध्ये कुठले कर्मचारी कोठे काम करतात याबाबत गार्डन विभागाने खुलासा करावा.

यावर श्री.गोयल यांनी खुलासा केला.

यावर उपायुक्त यांनी सांगितले की, महानगरपालिकेमध्ये बिगारी या दर्जाचे बरेच कर्मचारी आहेत. त्याबाबत ३१ मार्च २००८ पर्यंत आढावा घेतला जाईल असा खुलासा केला व ज्याठिकाणी आवश्यकता असेल तेवढेच कर्मचारी नेमण्यांत येतील.

मा.श्री.गिरवले - सर्व विभागांना व्हीजीट देण्यांत यावी.

-- * --

ठराव : अ) इतिवृत्त कायम करण्यांत येत आहे.

ब) सभागृहाचा कल पाहता महानगरपालिके मधील बिगारी या पदाचे बाबत खाते निहाय माहिती घेवुन ज्या विभागास बिगारी या पदाच्या कामगारांची आवश्यकता आहे व ज्या विभागात अतिरिक्त कामगार असल्याबाबत प्रशासनाची खात्री होत असेल त्यानुसार प्रभारी आयुक्त यांनी सदरची माहिती ३१ मार्च २००८ अखेर माहिती संकलीत करणे बाबत कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री. कृ.द.जाधव

अनुमोदक : मा.श्री. कैलास गिरवले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : १५-०३-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : दुखवटयाचे प्रस्ताव.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर :

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दिनांक : १५-०३-२००८.

---

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या नविपेठ दवाखाना येथील प्रयोगशाळेमध्ये सेमी ॲटो ॲनालायझर मशिनवर करावयाच्या नविन तपासण्या व त्यांचे दर अखेर मंजुरीसाठी मा.महासभेपुढे निर्णयास्तव ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : महानगरपालिकेच्या नवीपेठ दवाखान्यामध्ये विविध प्रकारच्या प्रयोगशाळा तपासण्या करण्यात येतात. सदरच्या तपासण्या बद्दल घेण्यात येणारे दर तत्कालीन नगरपरिषद मा.स्थायी समिती ठराव नं.१ दिनांक ११/१/२००२ व मा.जनरल बोर्ड ठ.नं.३१ दि.२७/२/२००१ यांच्या मंजूरीने घेण्यात येत आहेत. परंतु काही तपासण्यांचे दर व नवीन व इतर तपासण्यांचे दर मंजूर नाहीत.

तसेच महानगरपालिकेने नवीपेठ दवाखान्यांमध्ये ॲटो ॲनालायझर मशीन घेतलेली आहे. त्या मशीनव्दारे नवीपेठ येथे सोबत सुचविल्याप्रमाणे करण्या योग्य नवीन तपासण्या आहेत. ॲटो ॲनालायझर मशीनवर करण्यात येणा-या तपासण्यांचे दर खाजगी प्रयोग शाळेमध्ये केल्यास जास्तीचे आहेत. व गरीब नागरिकांना परवडणारे नाहीत तसेच इतर काही त्याव्यतिरिक्त सोबत सुचविल्याप्रमाणे करण्या योग्य तपासण्या आहेत.

अहमदनगर महानगरपालिका नवीपेठ दवाखाना येथे ॲटो ॲनालायझरवर व इतर नवीन चालु करावयाच्या तपासण्याचा तक्ता व त्यासाठी शिफारस करण्यांत आलेले तपासणी योग्य दर.

| अ.नं. | प्रयोग शाळेतील तपासणीचा प्रकार | तपासणीसाठी लागणारे किट्स , औषधे व इतर साहित्य | इतर खर्च अथवा पूर्ण एका किट्सची किंमत | एका तपासणी करीता अंदाजे कमीत कमी येणारा खर्च | नवीपेठ दवाखाना येथे सुचविण्यात आलेले तपासणी योग्य दर | सुचविण्यात आलेल्या तपासणी दरांमध्ये सुचविलेले फेरबदल. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.जी.ओ.टी. | एस.जी.ओ.टी.किट | ८०० | २० | ३५ | | |
| २ | एल.डी.एच. | एल.डी.एच.किट | ७०० | ४० | ४५ | | |
| ३ | ट्राय ग्लिसराईड | ट्राय ग्लिसराईड किट | २४०० | १०० | १२० | | |
| ४ | सि.अल्ब्युमिन | अल्ब्युमिन किट | ३०० | २० | ३० | | |
| ५ | सि.टोटल प्रोटीन | टोटल प्रोटीन किट | ३०० | २० | ३० | | |
| ६ | डेंग्यु टेस्ट (रॅपीड) | डेंग्यु टेस्ट (रॅपीड) | ३०० प्रत्येकी | ३१५ | ३३० | | |
| ७ | मलेरिया टेस्ट (रॅपीड) | मलेरिया टेस्ट (रॅपीड) किट | ७५० (१३ टेस्ट) | ६२-५० | ६५ | | |
| ८ | एच.आय.व्ही. (रॅपीड) | एच.आय.व्ही. ट्रायडॉट किट | ३९१० (५० टेस्ट किट) | ४५ | ६० | | |
| ९ | ऑस्ट्रेलिया अँटेजीन (एच.बी.व्ही.) | HBS,Ag Kit | १७३२ (९६ टेस्ट) | ३० | ४० | | |
| १० | युरिन ॲसिटोन बॉडीज | Crystals of ammonia & Other Solution | २०० | २० | ३० | | |
| | एकुण औषधांसाठी येणारा अंदाजे खर्च | | ११३९२ | | | | |

तसेच महानगरपालिकेचा नवीपेठ दवाखाना हा अहमदनगर शहरातील नावाजलेला दवाखाना असुन ह्या दवाखान्यातील सोयी व सुविधांचा शहरातील गरीब जनतेला अत्यंत फायदा होत असतो. त्यामुळे सदरील नवीन तपासण्या व त्यांच्या दरास मा.स्थायी समिती व मा.जनरल बोर्ड यांची मंजूरी मिळणे आवश्यक आहे. तरी वरील प्रमाणे मंजुरी मिळणेसाठी आदेशास्तव सादर.

यावर चीफ मेडीकल ऑफिसर यांचा अभिप्राय की, वरील प्रमाणे दर मान्य करणे बाबत शिफारस आहे.

यावर मेडिकल ऑफिसर यांचा अभिप्राय की, नविपेठ दवाखान्यातील प्रयोग शाळेत करण्यात येणा-या चाचण्यांच्या दराबाबत सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे सुधारणा बाबत मा.सर्वसाधारण सभा / स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" नुसार सोबतच्या तक्त्याप्रमाणे नवीपेठ दवाखान्यातील प्रयोग शाळेत करण्यात येणा-या चाचण्याच्या दरांची आकारणी करणे योग्य सदरील प्रकारच्या चाचण्या ह्या नव्यानेच तपासणी करणेची सुविधा सुरु करणेंत येत आहे. तरी मान्यतेस्तव सादर. सबब मंजूरीकरुन मा.सर्वसाधारण सभा/ मा.स्थायी समितीकडे शिफारशीस्तव सादर.

नविपेठ दवाखाना येथे सेमी ॲटो ॲनालायझर खरेदी केलेले असुन त्यावरील काही तपासण्या नव्याने चालु करणे गरजेचे असुन तसेच इतर काही नविन तपासण्या चालु करावयाच्या आहेत. सोबत प्रकरणातील तपासण्या व त्यांचे दर यांस मा.स्थायी समिती सभा क्र. ११ ठराव क्र. ३ अन्वये मंजुरी दिलेली असुन अखेर मंजुरीस्तव मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, " अ " नुसार मा.महासभेसमोर मंजूरीस्तव सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मेडिकल ऑफिसर , चीफ मेडीकल ऑफिसर , व उपायुक्त (कर) यांच्या अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

मा.श्री.दिप चव्हाण - याबाबतचे दर आणि कर वाढविता येतात किंवा कसे महानगरपालिकेला २० फेब्रुवारी पर्यंत अंदाजपत्रक मंजूर करुन घ्यावे लागते.

मा.श्री.आगरकर - नविपेठ दवाखाना येथे ब-याच कामाचा वर्कलोढ आहे तेंव्हा अशा ठिकाणी ॲडमिनीस्टेटीव्ह ऑफिसर महानगरपालिकेने पाठविणे बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उपायुक्त - याबाबत सेवा शुल्क महानगरपालिकेला घेता येईल असे सांगितले.

मा.श्री.आगरकर - महानगरपालिकेने नागरिकांना रुग्णसेवा दिली पाहिजे.

उपमहापौर - मान्य करण्यांत यावे अशी सुचना दिली.

श्री.पवळे वसुली अधिक्षक - सेवा शुल्क घेवु शकतो असा खुलासा केला.

मा.श्री.दिप चव्हाण - सदरचा प्रस्ताव सात महिन्या नंतर आलेला आहे.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट नुसार व सभेमध्ये साधक - बाधक झालेल्या चर्चेनुसार नविपेठ दवाखाना येथील प्रयोग शाळेमध्ये सेमी ॲटो ॲनालयझर मशिनवर तपासणी करणे ही रूग्ण सेवा प्रथमतः तातडीने सुरू करावी. कार्यालयीन प्रस्तावानुसार फी आकारणी करणेस मान्यता देण्यात येत आहे. डॉ.टेकवानी , वैद्यकिय अधिकारी यांचे सुचनेनुसार रूग्णांची गैरसोय होवु नये यास्तव सध्या कार्यरत लॅब टेक्निशियन यांचेकडून सदरचे काम सुरू करणेत यावे मात्र विकृती शास्त्र तज्ञ ( पॅथॉलॉजिस्ट डॉक्टर ) हे नविन पद निर्माण करण्याचे दृष्टीने प्रशासनाने संपूर्ण माहितीसह सविस्तर प्रस्ताव तयार करून महासभेपुढे मंजुरीस्तव सादर करावा.

सुचक : मा.श्री. अभय ज.आगरकर

अनुमोदक : मा.श्री. दिपक सुळ

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : १५-०३-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : प्रभाग क्र.२१ मधील कै.उ.रा.बोगावत मार्गावरील बालाजी मंदिर परिसरात श्री.बालाजी मंदिर चौक व संगम चौक ते धरती चौक दरम्यान रस्त्यास महावीर प्रभुजी मार्ग असे नामकरण करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : प्र.क्र.२१ मधील कै.उ.रा.बोगावत ( खिस्त गल्ली ) मार्गावर श्री.बालाजीचे अडीचशे वर्षापुर्वीचे अतिप्राचिन मंदिर असुन सदर मंदिराचे परिसरास "श्री.बालाजी मंदिर चौक " असे नामकरण करणे बाबत तसेच संगम चौक ते धरती चौक दरम्यानच्या रस्त्यास " श्री.महावीर प्रभुजी मार्ग " असे नामकरण करणे बाबत प्र.क्र.२१ चे मा.नगरसेवकांनी व नागरिकांनी संदर्भिय पत्रान्वये सुचविले आहे.

खिस्तगल्लीतील बालाजी मंदिर परिसरातील चौकास कोणतेही नांव दिलेले नाही. मात्र संगम चौक ते धरती चौक दरम्यानच्या रस्त्यास " महाराणी गल्ली " असे संबोधिले जाते. मात्र तशा प्रकारचा ठराव तत्कालीन नगरपरिषद अथवा महानगरपालिके मार्फत करण्यात आलेला नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि ड प्रकरण ११ (२) नुसार महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेमध्ये विहीत असलेला कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी नांव देणेचे अधिकार मा.आयुक्तांना असलेने सदरचे प्रकरण मा.महासभेपुढे ठेवणेकरीता आदेशार्थ सविनय सादर.

यावर कनिष्ठ अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे निर्णयास्तव सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, नगर रचनाकार यांचे अभिप्रायासह सादर करणे

यावर नगर रचनाकार यांचा अभिप्राय की, ज्या रस्त्यांचा नामकरण प्रस्ताव आहे ते रस्ते,मंजुर विकास योजनेत विद्यमान रस्ते दर्शविले आहेत. त्यामुळे त्या रस्त्यांचे नामकरण विहीत पध्दती अनुसरून नामकरण करण्यास हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित मा.महासभेच्या मान्यतेकरीता पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे घेण्यात यावे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट कनिष्ठ अभियंता,शहर अभियंता,नगर रचनाकार,मा.उपायुक्त (सा) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

-- * --

चर्चा :

मा.श्री.चोपडा - सदर विषय मंजुर करा.

मा.श्री.गिरवले - माझे त्यास अनुमोदन आहे.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. किशोरकुमार बोरा

अनुमोदक : मा.श्रीमती. मंगल गुंदेचा

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : १५-०३-२००८.

---

प्रस्तावाचा विषय : एकात्मिक शहर विकास योजना, अहमदनगर (सुधारित ) सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुकाने / गाळे / कार्यालये / भाजीचे ओटे यांचे भाडेमूल्य ठरविणे बाबत ऑफिसचा रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : एकात्मिक शहर विकास योजने अंतर्गत सावित्रीबाई व्यापारी संकुलातील दुकान केंद्राचे फेज - २ चे काम पुर्ण झालेले आहे. तसेच या व्यापारी संकुलाच्या पश्चिमेकडील भाजी मंडई व त्यावरील कार्यालयाचे काम देखील पुर्ण झालेले आहे. हे नविन बांधकाम विद्यमान दुकान संकुलाच्यावर दुसरा मजला, विंग " ब " चे तळमजला + दोन मजले हे बांधकाम तसेच भाजी मंडई व तयावरील पहिला मजला अशा स्वरुपाचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. आता या बांधकामातील दुकान गाळे, कार्यालय व भाजी ओटे वितरीत करणेसाठी त्यांचे भाडेमुल्य ठरविणे आवश्यक आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४८ मधील कलम ७९ अन्वये या भाडेमुल्यास व प्रत्यक्ष वितरणा बाबतचे धोरण ठरविणेसाठी या प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे. त्या अनुषंगाने हा प्रस्ताव मा.महासभेस निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त नमुद दुकान / गाळयांचा भाडेमुल्य अहवाल खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१. जागेची माहिती :- विषयांकित जागा सावेडी उपनगरात असुन नगररचना योजना अहमदनगर क्र.४ च्या माध्यमातुन अहमदनगर महानगरपालिकेस प्राप्त झालेली आहे. ही जागा भिस्तबाग रोड या प्रमुख रस्त्यावर सन्मुख असुन समोर मध्यवर्ती कार्यालय (Central Buildding) विद्यमान आहे. आजूबाजूस संपुर्ण रहिवास विकास झालेला असुन जवळच प्रोफेसर कॉलनी चौक, झोपडी कॅन्टीन चौक इत्यादी वाणिज्य केंद्रे विकसीत झालेली आहेत. हा संपुर्ण परिसर चांगल्या पध्दतीने विकसित झालेला असल्याने या जागेस पुरेशी वाणिजय क्षमता प्राप्त झालेली आहे. मात्र आता ज्या बांधकामांचे भाडेमुल्य ठरवायचे आहे. ती बांधकामे प्रत्यक्ष भिस्तबाग रस्त्यावर सन्मुख नाहीत. ही दुकाने गाळे / कार्यालये इत्यादी भिस्तबाग रस्त्यापासुन आतील बाजुस आहेत. या बाबीचा भाडेमुल्यावर निश्चितच परिणाम होणार आहे.

२. मुल्यांकनाची पध्दत :- मुल्यांकन करण्याच्या विविध पध्दती असल्या तरी प्रस्तुत प्रकरणी मुल्यांकनाची जमीन + बांधकाम ही पध्दत सर्वात योग्य असल्याने या पध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे.

३. जागेचे क्षेत्र :- प्रकरणातील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल या दुकान केंद्रासाठी ९०४५-०० चौ.मी. इतका भुखंड दर्शविण्यात आला असुन या भुखंडाच्या पश्चिमेकडील भाजी मंडई साठी ६३५७.०० चौ.मी.इतक्या क्षेत्राचा भुखंड ठेवण्यात आलेला आहे. या दोन्ही भुखंडावर स्वतंत्र इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. तथापि भाडेमुल्य ठरवितांना हे भाडेमुल्य प्रति चौ.मी.या पध्दतीने ठरविण्याचे असल्याने जागेच्या क्षेत्राचा विचार करण्याची आवश्यकता नाही. या संपुर्ण परिसरासाठी चटई क्षेत्र निर्देशांक एक इतका अनुज्ञेय असल्याने जेवढया क्षेत्राचे बांधकाम आहे. तितक्याच क्षेत्राची जागेसाठीची किंमत विचारात घ्यावी लागेल.

४. जागेची किंमत :- सन २००७-२००८ या सालाच्या शिघ्रसिध्द गणकातील दराप्रमाणे विषयांकित जागेचा दर रु.४६००/- प्रति चौ.मी.इतका आहे. प्रत्यक्ष चौकशी करता या भागात सुमारे रु.५०००/- प्रती चौ.मी.इतका दर आहे. मात्र विषयांकित जागा प्रत्यक्ष भिस्तबाग रस्त्यापासुन आतील बाजुस बसल्याने या जागेच्या दरात २०% घट देणे योग्य होईल. त्यामुळे या जागेचे मुल्य रु.५००० x ०.८० = रु.४०००/- प्रति चौ.मी. इतके गृहीत धरणे योग्य होईल. विषयांकित भाडेमुल्य हे कारपेट एरिया प्रमाणे काढण्यात येणार असल्याने या जागेचे मुल्य, भाडेमुल्य काढतांना २५% ने जास्त गृहीत धरावे लागेल.

जागेचे मुल्य :- रुपये ४००० x १.२५ = ५०००.०० चौ.मी.

५.बांधकामाचा खर्च :- प्रस्तुत प्रकरणातील बांधकामासाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्चाची माहिती बांधकाम विभागाकडून घेण्यांत आलेली आहे. तसेच परिसर विकासाकरीता व इतरही अपेक्षित खर्च किती येणार आहे. याची देखील माहिती बांधकाम विभागाने दिलेली आहे. ती सोबत सादर करीत आहे. या माहिती वरुन दिसुन येईल की, या कामी खालील प्रमाणे खर्च झालेला आहे / होणार आहे.

* (दुकान संकुल)

| | |
|---|---|
| अ) प्रत्यक्ष बांधकामावरील खर्च :- | रुपये ८९,४६,०५०/- |
| ब) अंतर्गत विद्युती करण :- | रुपये ३,००,०००/- |
| क) बाहेरील विद्युतीकरण :- | रुपये १,५०,०००/- |
| ड) परिसर विकास :- | रुपये १,००,०००/- |
| एकुण :- | रुपये ९४,९६,०५०/- |

* (भाजी मंडई व कार्यालये)

| | |
|---|---|
| अ) प्रत्यक्ष बांधकामावरील खर्च :- | रुपये ५५,०५,१६७/- |
| ब) अंतर्गत विद्युती करण :- | रुपये १,६४,१४८/- |
| क) बाहेरील विद्युतीकरण :- | रुपये १,००,०००/- |
| ड) परिसर विकास :- | रुपये १,००,०००/- |
| एकुण :- | रुपये ५८,६९,३१५/- |

६) इमारतीतील प्रत्यक्ष भाडयाने द्यावयाचे क्षेत्र :- (कारपेट एरीया)

अ) दुकान संकुलाचा कारपेट एरिया :-

| | |
|---|---|
| १.तळमजला :- | २५३.०० चौ.मी. |
| २.पहिला मजला :- | ३१४.०० चौ.मी. |
| ३.दुसरा मजला :- | ७४३.०० चौ.मी. |
| एकुण :- | १३१०.०० चौ.मी. |

| * बांधकामाचा दर | प्रति चौ.मी.कारपेट एरिया | |
|---|---|---|
| ९४,९६,०५०/- | १३१०.०० | = रु.७२४८.८९/- प्रति चौ.मी. |

* Say ru. ७२५०.०० चौ.मी.

७. भाजी मंडई व कार्यालये प्रत्यक्ष भाडयाने घ्यावयाचे क्षेत्र कारपेट एरिया.

| | |
|---|---|
| १. तळमजला :- | ३१०.०० चौ.मी. |
| २. पहिला मजला :- | २३०.०० चौ.मी. |
| एकुण :- | ५४०.०० चौ.मी. |

| * बांधकामाचा दर | प्रति चौ.मी.कारपेट एरिया | |
|---|---|---|
| ५८,६९,३१५/- | ५४०.०० | = रु.१०,८७०/- प्रति चौ.मी. |

उपरोक्त माहितीच्या अधारे प्रकल्पनिहाय भाडेमुल्य खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१. सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल.

अ) जागेचे मुल्य ५०००.०० प्रति चौ.मी.

ब) बांधकामाचे मुल्य रुपये ७,२५०/- प्रति चौ.मी.

क) उपरोक्त प्रकल्पातुन १२% प्रति वर्षे दराने उत्पन्न अपेक्षित आहे.

(५००० + ७२५०) X .०१२ = रुपये १,४७०/- प्रति चौ.मी. प्रति वर्षे.

ड) इमारतीसाठी देखभाल खर्च, प्रशासकीय व वसुली खर्च, विमा इत्यादी बाबीसाठी वार्षिक खर्च (Out Gouing) २०% दराने गृहीत धरणे आवश्यक आहे. त्यामुळे वार्षिक उत्पन्नात २०% वाढ दर्शविणे आवश्यक आहे.

सबब अपेक्षित वार्षिक उत्पन्न रुपये १४७०.०० प्रति चौ.मी.
०.८०

= १८३७.५० प्रति चौ.मी. (प्रति वर्षे)

अपेक्षित मासिक उत्पन्न रुपये १५३.०० प्रति चौ.मी.

वरील प्रमाणे अपेक्षित उत्पन्न मजला निहाय अनुक्रमे ४०%, ३५%, २५% याप्रमाणे तीन मजल्यास विभागून देणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे मजला निहाय खालील प्रमाणे भाडे आकारणी येईल.

१. तळमजला :- १८०.०० चौ.मी.प्रति महिना

२. पहिला मजला :- १५०.०० चौ.मी.प्रति महिना

३. दुसरा मजला :- १२०.०० चौ.मी.प्रति महिना

अनामत रक्कम :- या व्यापारी संकुलातील गाळयासाठी रुपये ८०००.०० चौ.मी. या दराने तर कार्यालयासाठी रुपये २०००.०० चौ.मी.या दराने आकारणी करणे योग्य होईल. खाजगी व्यक्ती / संस्था व्यतिरिक्त शासनाच्या कोणत्याही कार्यालयाने, कार्यालयाची मागणी केल्यास अनामत रक्कमेत पुर्ण सवलत देण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना देणे योग्य होईल. या अनामत रक्कमेतुन दर साल दर शेकडा ६% व्याजाचे उत्पन्न गृहित धरल्यास उपरोक्त दुकानाचे भाडे मुल्य रुपये १८०/- ऐवजी रुपये १४०/- चौ.मी. महिना एवढे येईल. कार्यालयासाठी मुळातच अनामत रक्कम कमी असल्याने त्याच्या व्याजाचा विचार करण्याची आवश्यकता नाही.

वरील प्रमाणे आकारणी केल्यानंतर या दुकान संकुलातील काही दुकानांचे भाडे व अनामत रक्कम खालील प्रमाणे येईल.

| अ.नं. | दुकानाचे क्षेत्र चौ.मी. | मासिक भाडे मुल्य | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ९.०० चौ.मी. | रु. १,२६०/- | रु.७२,०००/- |
| २ | १५.०० चौ.मी. | रु.२,१००/- | रु.१,२०,०००/- |

३ कार्यालयाचे क्षेत्र व आकार भिन्न असले तरी सुमारे ४०.०० चौ.मी. क्षेत्रासाठी आकारणी खालील प्रमाणे येईल.

**पहिला मजला**

| अ.नं. | कार्यालयाचे क्षेत्र चौ.मी. | मासिक भाडे | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ४०.०० चौ.मी. | रु. ६,०००/- | रु.८०,०००/- |

**दुसरा मजला**

| अ.नं. | दुकानाचे क्षेत्र चौ.मी. | मासिक भाडे मुल्य | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ४०.०० चौ.मी. | रु.४,८००/- | रु.८०,०००/- |

उपरोक्त भाडेमुल्या व्यतिरिक्त मालमत्ता कर, लाईट बिल, इत्यादी खर्च संबंधित भाडेक-याने करणे अपेक्षित आहे.

२) सावित्रीबाई फुले भाजी मंडई व कार्यालये :-

अ. जागेचे मुल्य रुपये ५,०००/- प्रति चौ.मी.

ब. बांधकामाचे मुल्य रुपये १०,८७०/- प्रति चौ.मी.

क. उपरोक्त प्रकल्पापासुन १०% प्रति वर्ष दराने उत्पन्न अपेक्षित आहे.

(५०००+१०८७०) x ०.१० = १,५८७/-

ड. इमारतीसाठी देखभाल खर्च, प्रशासकीय व वसुली खर्च विमा व इतर बाबीसाठी वार्षिक खर्च (Out goings ) २५% दराने गृहीत धरणे आवश्यक आहे. (भाजी मंडईसाठी देखभाल खर्च

जास्त अपेक्षित असुन हा खर्च १५% दराने धरलेला आहे.) त्यामुळे वार्षिक उत्पन्नात २५% वाढ दर्शविणे आवश्यक आहे.

वार्षिक उत्पन्न = $\frac{१५८७}{०.७५}$ = २,११६/-

अपेक्षित वार्षिक उत्पन्न = २,११६/- प्रति चौ.मी.

प्रतिमाह अपेक्षित उत्पन्न = २,११६ = १७६ प्रति चौ.मी.

भाजी ओट्याचे भाडे मुल्य व अनामत रक्कम

अनामत रक्कम.

भाजी ओट्यापैकी कोप-यातील मोठ्या आकाराच्या भाजी ओट्यासाठी रुपये ३०,०००/- प्रति ओटा तर मधील छोट्या आकाराच्या ओट्यासाठी रुपये २५,०००/- प्रति ओटा इतकी किमान अनामत रक्कम घेणे योग्य होईल.

पहिल्या मजल्यावरील कार्यालयासाठी रुपये २,०००/- प्रति चौ.मी. इतकी किमान अनामत रक्कम घेणे योग्य होईल.

वरील प्रमाणे आकडेमोड करुन भाजी ओट्याचे व त्यावरील कार्यालयाची अनामत रक्कम खालील प्रमाणे येईल.

| अ.नं. | ओट्याचे क्षेत्र चौ.मी. | मासिक भाडे मुल्य | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ३.२४ चौ.मी. | ५७०/- | २५,०००/- |
| २ | ३.८५ चौ.मी. | ६८०/- | ३०,०००/- |

| अ.नं. | कार्यालयाचे क्षेत्र चौ.मी. | मासिक भाडे | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ११.७२ चौ.मी. | २,०६२/- | २२,२४०/- |

वरील प्रमाणे उपरोक्त प्रकल्पातील दुकान / गाळयाची / कार्यालये / भाजी ओटे यांची भाडे आकारणी करणे योग्य होईल. असे या विभागाचे मत आहे. ही आकारणी खालील अटीस अधिन राहुन केलेली आहे.

१. या आकारणीत प्रत्येक तीन वर्षांनी १५% वाढ करणेत येईल.

२. संबंधित दुकान / ओटे / कार्यालय धारकांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या क्षेत्राचा मालमत्ता कर व इतर कर तसेच विजबिल इत्यादी. खर्च करणे अपेक्षित आहे.

अनुषंगाने नमुद करण्यात येते की, सध्या शहरात भूखंडातील इमारतीच्या सामासिक अंतरात दुकाने काढून ती वापरण्याची प्रवृत्ती वाढीस लागलेली आहे. या अनाधिकृत दुकानामुळे अधिकृत दुकानदारांच्या व्यवसायावर अत्यंत प्रतिकुल परिणाम होत आहे. तसेच विविध सणांच्या वेळी (उदा- राखी पौर्णिमा, दिवाळी इत्यादी ) तात्पुरत्या स्टॉलसाठी महानगरपालिका मार्फत मंजुरी दिली जाते. अशा प्रकारच्या स्टॉल्समुळे अनेक वाहतुक समस्या उभ्या राहतात. व अशा स्टॉल्समुळे देखील अधिकृत दुकानदार अडचणीत येतात.

सध्या सावेडी परिसरात अनेक ठिकाणी भाजी विक्रेते रस्त्यावर भाजी विक्रीचा व्यवसाय करतात. आता उपरोक्त प्रकल्पामुळे अधिकृत भाजी मंडईची सोय होणार आहे. त्यामुळे हे रस्त्यावरील भाजी विक्रेते तातडीने हटविणे आवश्यक आहे. व कायमस्वरुपी ते रस्त्यावर बसणार नाहीत. याची दक्षता घ्यावी लागेल.

या प्रकल्पातील गाळयांची वसुली खालील दोन पध्दतीने करता येईल. त्या बाबतचा धोरणात्मक निर्णय देखील मा.महासभेने घेणे अपेक्षित आहे.

अ. प्रत्येक दुकान गाळयाचे क्षेत्र निहाय भाडेमुल्य व अनामत रक्कम ठरवुन भाडेमुल्य कायम ठेवुन, अनामत रक्कमेची निविदा, गाळा / दुकान निहाय काढणे (प्रचलित पध्दत)

ब. एकत्रीत दोन्ही इमारती पासुन मिळणारे एकुण भाडेमुल्य व एकुण अनामत रक्कम यांची एकत्रीत निविदा काढून वसुली अभिकर्ता नेमणे. या अभिकर्त्यानेच इमारतीची देखभाल करणे परिसराचा विकास करणे, स्वच्छता ठेवणे, भाडे वसुली करणे इमारतीचा विमा उतरविणे इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. उपरोक्त भाडेमुल्य ठरवितांना या सर्व खर्चाचा विचार करुन भाडेमुल्यात वाढ दर्शविलेली आहे. हा अभिकर्ता नेमल्यास हा खर्च ठेकेदाराने स्वत: करणे अपेक्षित असल्याने ही बाब विचारात घेवुन वरील एकत्रीत भाडेमुल्यात व अनामत रक्कमेत २०% घट देणे योग्य होईल म्हणजेच एकत्रीत वसुलीसाठी अभिकर्ता नेमतांना किमान देकार रक्कम नमुद करताना उपराक्त भाडेमुल्य व अनामत रक्कमेत २०% घट देवुन किमान देकार रक्कम ठरविणे आवश्यक आहे. नमुद करण्यात येते की, उपरोक्त दोन धारणात्मक प्रस्तावापैकी प्रस्ताव क्र. " ब " अधिक संयुक्तीक वाटते. या प्रस्तावात सुरुवातीस रक्कम कमी मिळणार असली तरी हा निधी एकत्रितरित्या उपलब्ध होईल. तसेच या कामी महानगरपालिकेचा कर्मचारी वर्ग वसुलीसाठी नियुक्त करण्याची आवश्यकता राहणार नाही. तसेच ही इमारत खाजगी वसुली अभिकर्त्यांस दिल्यास या इमारतीची व परिसराची अधिक चांगल्या रितीने देखभाल ठेवली जाईल असे अपेक्षित आहे. तसेच शासनाच्या विविध नियमानुसार दुकान / गाळे वेगवेगळया व्यक्तीसाठी आरक्षित ठेवुन त्यांनाच ती वितरीत करणे वसुली अभिकर्त्यावर बंधनकारक राहील. त्यामुळे या प्रस्तावास प्रशासनानी शिफारस करावी असे मत आहे. ही किमान देकार रक्कम खालील प्रमाणे येईल.

व्यापारी संकुलातुन अपेक्षित उत्पन्न (एकुण) :-

| मासिक भाडे | अनामत रक्कम |
|---|---|
| रु.१,७१,६८०/- | रु.४१,३८,०००/- |

भाजी मंडई इमारतीतुन अपेक्षित उत्पन्न एकुण :-

| मासिक भाडे | अनामत रक्कम |
|---|---|
| रु.९५,०४०/- | रु.२७,००,०००/- |

एकुण अपेक्षित उत्पन्न :-

| मासिक भाडे | अनामत रक्कम |
|---|---|
| रु.२,६६,७२०/- | रु.६८,३८,०००/- |

किमान देकार रक्कम उपरोक्त अपेक्षित उत्पन्नापेक्षा २०% कमी असणे आवश्यक आहे. म्हणुन किमान देकार रक्कम खालील प्रमाणे येईल.

| मासिक भाडे | अनामत रक्कम |
|---|---|
| रु.२,१३,०००/- | रु.५५,००,०००/- |

वरील प्रमाणे भाडेमुल्य दरास मंजुरी मिळणेसाठी तसेच उपरोक्त धोरणात्मक निर्णय घेणेसाठी प्रस्ताव महासभेस सादर करणे योग्य होईल.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित नुसार उपरोक्त दोन्ही इमारतीपासुन मिळणारे एकुण भाडेमुल्य व एकुण अनामत रक्कम यांची एकत्रित निविदा काढण्यांत येवुन अनामत रक्कमेचा लिलाव करुन निविदा प्रक्रिया करणे योग्य वाटते. तरी सदरचे बाब धोरणात्मक स्वरुपाची असले कारणाने मा.महासभेकडे सदरचा प्रस्ताव सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवावे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) व महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

मा.श्री.अनंत जोशी - नगररचना विभागाकडुन सदरचा प्रस्ताव आलेला आहे. याबाबत अभिकर्ता नेमुन कार्यवाही करावी असे सुचविले.

मा.श्री.पवार - अभिकर्ता नको महानगरपालिकेने कार्यवाही करावी.

मा.श्री.कानडे - अभिकर्ता नेमल्यास अभिकर्त्याची दादागिरी होईल त्याकरीता शासकीय नॉर्म्स काय आहेत. नियमाप्रमाणे महिला मागासवर्गिय इत्यादी करीता कशा प्रकारे देणार आहात. शासकीय कोट्याप्रमाणे राखीव ठेवण्यांत यावे.

मा.श्री.जाधव - अभिकर्ता नेमु नये या बाबत महानगरपालिकेने जकात अभिकर्ता नेमलेला आहे तसेच मनपा सिध्दीबाग उद्यानामध्ये फुलराणी चालविण्याकरीता अभिकर्ता नेमलेला आहे. त्याचा अनुभव महानगरपालिकेला असल्यामुळे त्याची काय अवस्था झाली आहे हे पाहुन त्याकरीता अभिकर्ता नेमु नये. वसुली विभागाकडे मार्केटची काय परिस्थिती आहे. त्यांचे रेकॉर्ड व्यवस्थीत नाही. पैसे वसुल का होत नाहीत हे समजु शकत नाही. वरील परिस्थिती पाहता अभिकर्ता आजिबात नेमु नये.

मा.श्री.गिरवले - सदरचे गाळे जागा भाडयाने देतांना इतर टॅक्स लावणे बाबत काय प्रयोजन आहे. सदर जागा मालक म्हणुन महानगरपालिका स्वतःच असतांना घरपट्टी आकारणी करण्याचे कारण नाही.

मा.श्री.आगरकर - सदर इमारतीचे काम ए.श.वि.यो. मधुन झाले असल्यामुळे या योजनेतुन झालेला खर्च वसुल झाला पाहिजे.

श्री.धोंगडे नगररचनाकार - सदर बाबीमध्ये मनपाचे घरपट्टी व इतर टॅक्सेस महानगरपालिकेला घ्यावे लागतील असे सुचविले.

सभागृहात गोंधळ

मा.महापौर - सदर बाबतीत भाडयामध्येच घरपट्टी ॲड करुन दिली तर शिवाय लिलाव पध्दतीने आपण गाळे द्यावे असे सांगितले.

मा.श्री.मिलींद गंधे - अभिकर्ता नेमण्यांस विरोध आहे. रस्त्यावर जे भाजी विक्रेते सध्या बसतात त्यांची नोंद करुन घेवुन त्यांना प्राधान्याने गाळे देण्यांत यावे व रस्त्यावर कोणत्याही प्रकारची भाजी विकली जाणार नाही याची दक्षता यापुढे घेण्यांत यावी.

मा.महापौर - लवकरात लवकर लिलाव पध्दतीने गाळे देण्यांत येतील.

मा.उपमहापौर - बंद पाकिट निविदा मागविण्यांत येतील.

मा.श्री.आगरकर - बंद पेटी आयुक्त कार्यालयांत राहील.

मा.श्री.भानुदास कोतकर - महानगरपालिका टॅक्स भाडयामध्ये एकत्र करुन आकारणी करावी.

प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, सदर योजना केंद्र शासनाच्या योजनेतुन होत असल्याने यामध्ये घरपट्टी आकारण्याचा विषय हा स्वतंत्र विषय आहे.

मा.महापौर - ओट्यावरील टॅक्स माफ करुन इतर टॅक्स मात्र माफ होणार नाही.

मा.श्री.वाकळे - मालमत्ता कर यामध्ये लावण्यांस माझा विरोध नोंदविण्यांत यावा.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट व सभेमध्ये साधक बाधक चर्चा यांचा विचार करून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१. ऑफिस रिपोर्ट मधील भाडे मुल्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि मालमत्ता कर व इतर आवश्यक कर यांची आकारणी स्वतंत्ररित्या न करता प्रती वर्षी या करांची गाळे धारकास अदा करावी लागणारी रक्कम व गाळयाचे होणारे भाडे यांचा एकत्रित हिशोब करून सुधारित भाडे रक्कम ठरवावी.

२. गाळयांच्या प्रत्यक्ष वितरणाच्या धोरणाबाबत ऑफिस रिपोर्ट मध्ये प्रशासनाने दोन विकल्प (पर्याय ) दिलेले आहेत. त्यापैकी पर्याय " अ " मंजुर करण्यात येत आहे. त्याप्रमाणे प्रत्येक दुकान गाळयाचे क्षेत्र निहाय भाडे मुल्य व अनामत रक्कम ठरवुन भाडे मुल्य कायम ठेवुन अनामत रक्कमेची निविदा, गाळा / दुकान / कार्यालय निहाय काढण्यात यावी. (प्रचलित पध्दत ) या पैकी काही गाळे शासनाच्या नियमाप्रमाणे आरक्षित करण्यात यावेत. याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

तसेच १५ दिवसाचे आत सदरच्या निविदा प्रसिध्द करण्यात याव्यात.

सुचक : मा.श्री. नामदेवराव पवार
अनुमोदक : मा.श्री.कृ.द.जाधव.
ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक : १५-०३-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अनधिकृत व नियमबाहय बांधकामे दंड / प्रशमन शुल्क आकारून नियमित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : उपरोक्त विषयाबाबतचा प्रस्ताव तत्कालीन नगरपारिषदने शासनास संदर्भिय ठराव क्र. १४ दिनांक १०/०५/९४ अन्वये सादर केलेला होता. त्यावर शासनाने संदर्भित पत्र क्र. २ अन्वये असे कळविलेले आहे की. या प्रस्तावाच्या अनुषंगाने आता नव्याने स्थापन झालेल्या महानगरपालिका स्तरावर चर्चा होणे गरजेचे आहे. त्यामुळे महानगरपालिका म्हणून महासभेचे स्पष्ट अभिप्राय घेण्यांत यावेत. त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव महासभेच्या मंजूरीसाठी सादर करण्यांत येत आहे.

अ) प्रस्तावाची आवश्यकता आणि प्रयोजन :-

मुळांत तत्कालीन नगरपारिषदेने सादर केलेल्या प्रस्तावीत या विषयाची आवश्यकता नमुद केलेली आहे. या प्रस्तावास १२ वर्षापेक्षा आधिक कालावधी लोटून गेला असाला तरी प्रस्तावाची कारणे तीच आहेत. ही कारणे संक्षिप्त स्वरुपात खालील प्रमाणे पुन्हा देत आहे.

१) शहरात काही ठिकाणी अहमदनगर मनपाची मंजुरी न घेताच बांधकाम करण्याची प्रवृत्ती आढळते अशी बांधकामे झाल्यानंतर अतिक्रमण विभागाने ती शोधून काढल्यानंतर अथवा त्याबाबत तक्रार झाल्यास त्या मालकावर कायेदेशिर कार्यवाही सुरु होते अशा कारवाई च्या दरम्यान सबंधीतांनी बांधकाम आराखडा मंजूरीसाठी सादर केल्यास त्यास मंजुरी देणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे असे अनाधिकृत बांधकामे करणा-याचे मनोबल वाढते त्याचवेळेस जे नागरीक रितसर परवानगी घेवून व याग्य तो विकासभार भरुन बांधकाम परवानगी घेतात त्यांच्यावर एक प्रकारे मोठा अन्याय होतो. या प्रस्तावात अशा नियमात बसणा-या पण विना परवाना केलेल्या बांधकामावर दंड बसवण्याची तरतुद करण्यांत येत आहे.

२) शहरात जोता तपासणी प्रमाणपत्र (Plinth checking Certificate) भोगवटा प्रामणपत्र (Occupancy Certificate) घेणा-यांची संख्या नगन्य आहे. या प्रस्तावामुळे दंडाच्या भितीमुळे यात लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे.

३) प्रत्यक्ष बांधकाम करतांना भुखंडाची रचना बांधकामाच्या अडचणी वैयक्तीक घरमालकाच्या बदललेल्या अपेक्षा यामुळे मंजूर बांधकामा व्यतिरीक्त जागेवर वेगळे बांधकाम करण्यांत येते या किरकोळ स्वरुपाच्या विसंगतीमुळे त्या इमारतीवर अनाधिकृतपणाचा शिक्का बसतो हे किरकोळ फेरबदल योग्य तो दंड भरुन अर्जदारास त्या इमारतीचे अधिकृत इमारत म्हणून रुपांतर करण्याची संधी या प्रस्तावामुळे मिळेल.

४) सर्वात महत्वाचा या प्रस्तावाचा फायदा असा आहे की, या प्रस्तावामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात मोठी भर पडेल सद्याच्या या प्रस्तावामुळे किमान १० कोटी रुपायांच उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच पुढेही हा कायम स्वरुपी उत्पन्नाचा स्त्रोत असून दरवर्षी या प्रस्तावामुळे महानगरपालिकेस किमान २५ ते ३० लाख इतके उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

ब) प्रस्तावात कोण कोणत्या अनियमितता नियमानुकूल करणे योग्य ठरेल :-

१. अहमदनगर शहरात नेहमी आढळणा-या अनियमितता --

१) नियमात असणा-या परंतू विना परवाना असणारी बांधकामे.

२) मंजूर नकाशातील बाल्कनी बंदीस्त करणे.

३) तळघरात स्टोअर ऐवजी दकानांचा वापर करणे.

४) बांधकाम परवानगी रहिवास वापरांसाठी तर वापर वाणिज्य कारणासाठभ करणे.

५) सामासिक अंतरात किरकोळ फेरबदल.

६) सामासिक अंतरात कपाटे, जीन्याचा विसावा इत्यादी प्रोजेक्शन्स काढणे.

७) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील नागरीकांनी घेतलेल्या रो-हौसिंग पध्दतीच्या घरांत सामासिक अंतरात जीना काढणे.

२. शासनाच्या मार्गदर्शक सुचना :-

कलम १४३ च्या प्रस्ताबाबाबत शासनाने आदेश क्र. टी पी एस - १०९३ ८९६१ / सिआर नं. ३११/ ९३/ युडी -१२ दिनांक १६ डिसेंबर १९९३ अन्वये मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. त्यानुसार या कलमाखाली चटई नि क्षेत्र निर्देशांकापेक्षा अधिक कोणतेही बांधकाम नियमानुकुल करु नयेत अशा स्पष्ट सुचना दिल्या आहेत. त्याचा विचार हा प्रस्ताव तयार करताना करणे आवश्यक आहे.

३. इतर महानगरपालिकेनेही घेतलेले धोरणात्मक निर्णय यांचा तुलनात्मक विचार करणे आवश्यक आहे.

४. नियोजनाच्या दृष्टी कोणातून कोणतया अनियमिततेचा एकुण नियोजनावर थेट परिणाम होणार नाही याचा विचार करणे आवश्यक आहे. विशेषतःपार्कींग पुढील सामासिक अंतर या बाबी शहराच्या एकुण नियोजनावर थेट परिणाम करणा-या असल्याने त्यामध्ये सुट देणे योग्य होणार नाही.

वरील सर्व मुदयांचा विचार करता खालील अनियमितता दंड करुन नियमानुकूल करण्यास हरकत नाही असे वाटते.

१) नियमात असणारे परंतु विना परवाना असलेले बांधकाम.
२) मंजुर बांधकाम आराखडयात दर्शविलेल्या बालवुन्या बंदीस्त करणे.
३) मागील व बाजुच्या सामासिक अंतरात अनुक्रमे २० % व ३३ % पर्यंत सामासिक अंतराची अट शिथिल करणे.
४) ग्राउंड कव्हरेज ही अट एकूण बांधकाम क्षेत्राच्या २०% पर्यंत शिथील करणे.
५) सामासिक अंतरात प्रोजेक्ट केलेले जीन्यउाचे लॅन्डींग, कपाटे इत्यादी नियमानुकूल करणे.
६) सामासिक अंतरात लोखंडी जीना बसविणे.
७) सामासिक अंतरात रस्त्याच्या विरुध्द बाजुस असलेले गोडाउन, आउट हाउस, अशा स्वरुपाचे बांधकाम एकुण बांधकाम क्षेत्राच्या १० % मर्यादे पर्यंत नियमानुकूल करणे.
८) मंजुर बांधकामात दर्शविलेल्या वापराव्यती रिक्त इतर वापर (हा वापर त्या सबंधित विभागात अनुज्ञेय असणे आवश्यक आहे. व त्या वापरांसी सुसंगत इमारतीची रचना आवश्यक आहे.)

५. खालील अनियमितता नियमानुकूल करणेस पात्र ठरवणे योग्य होणार नाही.
१) मंजुर आराखडयातील वाहनतळाच्या क्षेत्रात फेरफार करणे.
२) एकूण अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकपेक्षा अधिक असलेली बांधकामे.
३) पुढील सामासिक अंतरात (रोड सेड बॅंक) केलेली बांधकामे.
४) अनुज्ञेय नसलेल्या सामासिक अंतरातील बालकन्या / बंदीसत बालकन्या.
५) अनुज्ञेय नसलेल्या विभागातील व्यसाय वापर.
६) आजुबाजूच्या नागरीकांच्या बांधकामाबाबत गंभीर तक्रारी असतील तर व या तक्रारीमध्ये मा. आयुक्त साो यांना तथ्य आढळले तर किंवा मा.आयुक्तांना इतर कोणत्याही सबळ कारणासाठी हे नियमानुकूलन करणे अयोग्य आढळले तर अशी बांधकामे अथवा अनियमीतता नियमानुकूल करण्यांस मा.आयुक्त साो. नकार देवू शकतील.

६. अनियमितता नियमानुकूल करतांना कशा पध्दतीने व काय दराने दंड अकारणे योग्य होईल.
१) दंड ठरवण्याचा निकष अथवा पाया (बेस)

दंड ठरवण्याचा निकष ठरवण्यासाठी तत्कालीन अहमदनगर नगरपरिषदेच्या संदर्भित प्रस्तावासह इतर काही महानगरपालिकेच्या अशा स्वरुपाच्या प्रस्तावांचा अभ्यास करण्यांत आला तसेच मा. आयुक्त साो. यांनी नगर रचनाकार यांचे समवेत शासनाच्या नगर विकास निभागाचे उपसचिव श्री.नागानुरे यांच्याशी चर्चा केली, केलेली अनियमितता ही त्या-त्या जागेवरील अतिरिक्त बांधकामामुळे झालेली असते त्यामुळे याचा सारासार विवेक बुध्दीने विचार करता या दंडासाठीचा दर त्या जमीनीच्या मुल्यावर आधारीत असणे आवश्यक आहे. काही नगरपालिकांनी हे दर सरसकट सर्व ठिकाणी सारखेच

ठेवलेले आहेत तर काही ठिकाणी त्यांची सांगड केलेल्या बांधकामाच्या किमतीशी घातलेली आहे या दोन्ही पध्दती स्वदोष वाटतात. याचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास एखाद्या जागा मालकाने केडगांव येथे बालकनी बंदीस्त केली तर त्याला लावावयाचा दंड व कापडबाजारात बंदीस्त केलेली बालकनी यांचा दर समान ठेवणे नैसर्गीक न्यायतत्वाला धरुन होणार नाही त्यामुळे जागेचे मुल्य हा निकष सर्वाधिक स्तंयुक्तीक वाटतो. तत्कालीन अहमदनगर नगरपालिकषदेने दंडाची रक्कम ठरवतांना विशिष्ट रक्कम न ठरवता काही ठिकाणी ती कमाल व किमान मर्यादेत ठरवली होती. (उदा दंड रुपये १००० ते १५००/- दरम्यान ) अशा पध्दतीमुळे सबंधित अधिका-याचे त्या प्रकरणातील डिस्क्रीशन (Discretion) वाढते. त्यामुळे प्रकरणाचा पारदर्शीपणा कमी होतो. त्यामुळे अशी रेंज देणे योग्य वाटत नाही. बांधकामाची किंमत ठरवतांना देखील अनेक क्रिष्ट पध्दती अवलंबव्या लागतात. त्यामुळे जमीनीच्या मुल्याचा निकष निर्धारीत करणे योग्य होईल.

७. प्रस्तातीत दंडाचे दर -

तत्कालीन अहमदनगर नगरपरिषदेने केलेले दर इतर महानगरपालिकांनी अवलंबीलेले दर व उपरोक्त जमीनीचा निकष ठरवून प्रस्तावीत दर ठरविण्यांत आले आहेत. त्यांचा तक्ता सोबत जोडलेला आहे. तसेच या दरांशी इतर महानगरपालिकेतील दरांशी तुलना करणा तक्ता सोबत जोडला आहे. त्यास मंजूरी अपेक्षीत आहे.

८. प्रस्तावाची अंमलबजावणी -

या प्रस्तावाची मा. शासनाच्या मंजुरीस अधीन राहून तात्काळ अंमलबजावणी सुरु केली जाईल. बेसमेटमधील स्टोअरच्या ऐवजी काढलेल्या दुाकंनाच्या प्रस्तावाची अंमलबजावणी शासनाच्या मंजुरी शिवाय करता येणार नाही व या प्रस्तावाकरिता निश्चित तारिख (Cut off Date) ठरवणे आवश्यक राहील.

९. प्रस्तावाच्या परिणामकारक अंमल बजावणीसाठी खालील पुरक कारवाई होणे आवश्यक आहे.

१) अतिक्रमण विभागाने अधिक दक्ष राहून विना परवाना बांधकामे व अनियमितता शोधून काढणे आवश्यक आहे.

२) पाणी पुरवठा विभागाने बांधकाम परवानगी शिवाय नळ जोडणी देवू नये. आणि भोगवटा प्रमाण पत्राशिवाय नळ जोडणीचे दर रहिवास विभागाचे लावू नये अर्थात या बंधनामुळे अनाधिकृत नळ जोडणीचा धोका संभवतो.

१०. प्रस्तावाचे व प्रस्तावाच्या अंमलबजावणीचे पुर्नविलोकन -

(Reniew of proposal and its implementation)

या प्रस्तावाचे व त्याच्या होणा-या परिणामाचे पुर्नविलोकन मा. आयुक्त सो यांनी प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरवातीला करणे योग्य होईल. या पुर्नविलोकना नंतर प्रस्तावीत दर योग्य आहेत किंवा कसे ? याची तपासणी करुन हे दर २५ % पर्यंत कमी किंवा जास्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो यांना देणे योग्य होईल. २५% पेक्षा अधिक दर वाढविण्याचे किंवा कमी करावायाचे असतील.तर किंवा या प्रस्तावात काही नवीन बाबींचा अंतर्भाव करावयाचा असेल तर तसा प्रस्ताव पुन्हा माहितीसाठी व योग्य त्या न्यायासाठी मा.महासभेपुढे सादर करणे आवश्यक राहील.

वरील प्रमाणे विवेचन विचारात घेता सदर प्रस्तावाचा मोठा आर्थिक फायदा महानगरपालिकेस तात्काळ सुरु होणार असल्याने सदरचा प्रस्ताव शक्य तितक्या लवकर मा.महासभेस सादर करण्यासाठी मंजुरीस्तव सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्ताव ब (८ ) मध्ये नमुद बेसमेंटमधील स्टोअरच्या ऐवजी काढलेल्या दुकानांना नियमाधिन केल्यास अशा प्रकारचे अनाधिकृत बांधकाम करणारांचे मनोधर्य वाढण्याची शक्यता आहे. तसेच अशा व्यावसायीक वापरामुळे इमारतीसमोर रस्त्यावर क्षमतेपेक्षा जास्त वाहने उभे राहून वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता आहे. सबब हे अनाधिकृत बांधकाम नियमाधिन करणे योग्य होणार नाही असे मत आहे. उर्वरीत प्रस्ताव मंजुर करणे योग्य राहील व प्रस्ताव मा.महासभेपुढे मान्यतेकरीता ठेवणे योग्य राहील.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित दन्डात्मक कारवाईबाबत आर्कीटेक्ट आणि डेव्हलपर्स यांचेशी चर्चा करणे संयुक्तीक वाटते. दि. २९/०८/०६ रोजी दु. ४.०० वा बैठकीस संबंधित संघटनेचे पदाधिका-यांना बोलवा.

यावर नगररचनाकार यांचा स्वतंत्र अहवाल की, दिनांक २९/८/२००६ रोजी मा.आयुक्त सो. यांचे अध्याक्षते खाली उपरोक्त विषयाबाबत बैठक संपन्न झाली. या बैठकीस आर्किटेक्ट इंजीनिअर्स आणि सर्व्हेअर्स असोसिएश्न व बिल्डर्स असोसिएशनचे पदाधिकारी उएपस्थित होते.

या बैठकीत प्रथम मा.आयुक्त सो.यांनी बैठकीचा हेतू विषद करुन विषयांकीत प्रस्तावाचे प्रयोजन व प्रस्तावाचा ढोबळ तपशिल उपस्थितांना विषद केला. त्याअनुषंगानें उपस्थितांचा याबाबतचे अभिप्राय विचारले विशेषतः विषयांकीत प्रस्तावात कोण कोणत्या बाबी अंतर्भुत असाव्यात व अशा नियमानुकूल करावयाच्या अनाधिकृत बांधकामासाठी काय दराने दंडाची अकारणी करणे योग्य ठरेल याबाबतचे उपस्थितांचे मत मा. आयुक्त सो यांनी विचारले असे मत नोंदवताना व्यवसायीक म्हणून विचार न करता शहराचे नागरीक म्हणून विचार करुन नगरशहरातील नागरीकांची क्रयशक्ती, त्यांना विकास नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी करताना येणा-या अडचणी व शहरात नेहमी आढळून येणा-या त्रुटी यांचा विचार करुन मत प्रदर्शित करावे अशी विनंती मा.आयुक्त सो. यांनी उपस्थितांना केली. तसेच प्रशासनाने उपरोक्त प्रस्तावात अंतर्भुत केलेल्या बाबीचीं (दंडाचे दर नव्हे) माहिती उपस्थितांना दिली.

मा. प्रस्तावावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली या चर्चेत प्रशासनाने अनाधिकृत बांधकामे नियमानुकूल करावयाच्या सर्व बाबींचा अंतर्भाव केला आहे असे उपस्थितांचे मत पडले. या प्रसतावाबरोबरच पुर्वी तळघरात बांधलेल्या दुकानांना देखील नियमानुकूल करण्यांत यावे अशी विनंती उपसिथतांनी केली. तथापी या बांधलेल्या तळघरातील दुकानामुळे चटई क्षेत्र निर्देशांकामध्ये वाढ होत असल्यामुळे शासनाच्या निदेशानुसार ही दुकाने या प्रस्तावामध्ये नियमानुकूल करता येणार नाहीत मात्र T.D.R च्या माध्यमातून अशा प्रकारच्या दुकानांना भविष्यात मंजूरी मिळू शकेल असे मत मा. आयुक्त सो. यांनी प्रदर्शित केले.

प्रस्तावातील बाबीवर आकारावयाच्या दंडाचे दर उपस्थितांनी सुचविले हे दर पुर्वी प्रशासनाने सुचविलेल्या दरांशी सर्वसाधारणपणे सुसंगत आहेत. बैठकीनंतर प्रशासनाने सुचविलेले दर, बैठकीत सुचविण्यांत आलेले दर, इतर महानगरपालिकेचे दर इत्यादी सर्व दरांचा अभ्यास करुन मा.आयुक्त यांनी प्रस्तावात अंतर्भुत करावयाचे दर अंतीम केलेले आहेत हे दर दर्शविणारा तक्ता सोबत सादर करीत आहे. कृपया त्यास मंजुरी मिळावी. सदरचा प्रस्ताव शक्य तितक्या लवकर महासभेस सादर करणे योग्य होईल असे मत आहे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य राहील. मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले. शहरातील अनाधिकृत बांधकाम जे नियमित करणेस पात्र आहे ते हॉर्डशीप प्रेमियम वसुल करून प्रस्तावित दराने नियमित करणेस हरकत नाही. सदरची कारवाई अनेक वर्षापासुन प्रलंबित होती. या नियमिती करणामुळे संबंधितांना दंड हा हार्डशिप स्वरूपात भरावा लागणार आहे, तसेच महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर महसूली उत्पन्न मिळणार आहे. मा.महासभेच्या मंजुरीनंतर अंमल सुरू करून शासनास अहवाल सादर करावा लागेल.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह व नगर रचनाकार यांचे स्वतंत्र अहवालासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

-- * --

चर्चा :

नगररचनाकार यांनी खुलासा केला की, महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर महानगरपालिका स्तरावर चर्चा होणे गरजेचे असल्याने महापालिका सभेपुढे मांडुन त्यावर अभिप्राय घेवुन परत पाठवावे अशा बाबत सुचविले असल्याने सदरचा प्रस्ताव मा.सभागृहापुढे लिगल रिटेनर यांचे मत घेवुन ठेवण्यासाठी सांगितले होते. त्यामुळे हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

अनधिकृत बांधकामे नियमित करणेबाबत माहिती दिली.

मा.श्री.कानडे - याबाबतचे नियम व उपविधी मंजुर केले आहेत काय तोपर्यंत या विषयाला विरोध आहे.

यावर नगररचनाकार यांनी सांगितले की, एम.आर.टी.पी.ॲक्ट नुसारच कार्यवाही करण्यांत येत आहे.

मा.श्री.कानडे - तरी सुध्दा आमचा विरोध नोंदविणे बाबत सुचविले.

मा.श्री.कृ.द.जाधव - यामुळे महानगरपालिकेचा फायदा होणार आहे. अहमदनगर शहरातील दवाखाने हॉस्पीटल इत्यादींना यामधुन सवलत देता आली तर त्याचा आवश्य विचार करावा. या बाबत सर्व डॉक्टरांनी महानगरपालिकेला पत्र दिलेले आहे.

मा.श्री.उडाणशिवे - अनधिकृत झोपडया नियमीत करण्याबाबत काय तरतुद आहे काय. स्मरणपत्र देण्यांत यावे.

मा.महापौर - खुलासा की, घोषित करण्या बाबत कार्यवाही चालू असते.

मा.श्री.अनंत जोशी - गुंठेवारी प्रकरणास हा नियम लागू आहे काय ? सदर नियम गुंठेवारी प्रकरणास लागू नसल्याचा खुलासा नगररचनाकार यांनी केला.

मा.श्री.सुळ उपमहापौर - गुंठेवारीतील किरकोळ दुरुस्ती बाबत महासभेची मंजुरी घेवुन शासनाकडे पाठवा. व नियमाबाबत प्रस्ताव सादर करावा.

यावर प्रभारी आयुक्त यांनी - नियमामध्ये दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित आहे. या बाबत कंटीन्युअस कार्यवाही होणार आहे. गुंठेवारी स्वतंत्र प्रस्ताव तयार करुन सभेपुढे सादर करावा अशा सुचना दिल्या.

मा.श्री.अनंत जोशी - पुढील सभेपुढे असा प्रस्ताव ठेवावा.

मा.श्री.नामदेव पवार - कंम्प्लीशन सर्टिफिकेट कंम्पलसरी करावे व अनधिकृत असल्यास तीन पट घरपट्टी लावण्यात यावी. दंडात्मक कारवाई किती लोकांवर केली आहे त्याची माहिती द्यावी.

मा.श्री.कृ.द.जाधव - सदर विषय मंजूर करण्यांस हरकत नाही पुढील विषय घ्यावा.

मा.श्री.कैलास गिरवले - ज्या बांधकामांना नियमानुसार परवानगी दिली आहे त्यांनी परत तेथे बांधकामे जर चालू ठेवली आहेत ती नियमबाह्य बांधकामे नियमीत करणे चुकीचे ठरणार आहे. या करीता पुढील बांधकाम नियमीत करु नये. अनधिकृत बांधकामा बाबत शहराचे दोन विभाग (सेल) तयार करुन श्री.मगर व इथापे यांना वाटप करुन त्याप्रमाणे काम देण्यांत यावे. तसेच बॉम्बे नर्सिग होम ॲक्ट नुसार हॉस्पीटल मधील बांधकामांबाबत काय करता येईल ते पहावे.

यावर मा.महापौर - दंडात्मक कारवाई करता येईल का ते पहावे.

मा.श्री.कैलास गिरवले - पार्किंगमध्ये बांधकाम केलेले असेल तर ती पार्किंग जागा मोकळी केली पाहिजे ती मोकळी केल्या शिवाय परवानगी देवू नये.

मंगल कार्यालयांस हा नियम लागू होत नाही.

मा.श्री.वाकळे - एफ.एस.आय.व्यतिरिक्त काही बांधकामे असतील त्याबाबत काय करणार आहात. ज्या इमारतींवर टेलिफोन मोबाईल टॉवर उभारणी करण्यांत आली आहे त्यास दंडात्मक कारवाई कायद्यानुसार करुन घेता येईल काय ?

मा.महापौर - दंडात्मक कारवाई करण्यांत यावी.

मा.श्री.आगरकर - सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे नगररचना विभागाने आणल्या बद्दल त्यांना मी धन्यवाद देतो. अनियमित बांधकामे नियमित करतांना टी.डी.आर. कोणता व कसा घेणार आहात. भौगोलिक परिस्थितीचा विचार करणार आहात काय. कापड बाजार व इतर अशा ठिकाणांचे स्पेसिफिकेशन झालेले नाही ते होणे आवश्यक आहे. केडगांव आणि कापडबाजार यामध्ये फरक आहे. याबाबतही खुलासा करावा. या बाबत प्रस्तावात त्रुटी आहेत. चटई क्षेत्रामध्ये वाढ असल्यास नियमानुसार करता येणार नाही. तसेच प्रकरण सादर होत असतांना प्रकरण आल्याची आणि पुर्ण केल्याची तारीख इत्यादी नोंदी करणे आवश्यक आहे. याबाबत ठरावात नमुद करावे.

सर्व नगर शहराचे अनधिकृत बांधकामे अंदाजे किती आहेत याबाबत व्ही.डी.ओ.शुटींग करुन ठेवण्यांत यावे व त्यामुळे महानगरपालिकेला ॲक्शन घेता येईल.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट व सभेमध्ये साधक - बाधक चर्चा यांचा विचार करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. ऑफिस रिपोर्ट मंजुर. प्रशासनाने अशा प्रकरणांची संपुर्ण तपासणी करून व मा.शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. आवश्यकतेनुसार दाखल प्रकरणांबाबत महानगरपालिका मानद कायदे तज्ञांचे मार्गदर्शन घेत जावे. दि.१-०४-२००९ पासुन पुढे दाखल होणा-या प्रस्तावित दरात १० % वाढ करणेस ही सभा मान्यता देत आहे.

२. पुर्वीच्या काळात अनेक बांधकाम व्यावसायिकांनी तळघरात स्टोअर असा उल्लेख करून प्रत्यक्षात दुकाने म्हणुन त्यांची विक्री केली आहे. व जागेवर दुकाने सुरू आहेत. ही दुकाने नियमाकुल करता येतील किंवा कसे याबाबत शासनाचे मार्गदर्शन घ्यावे. व त्यानंतर तसा प्रस्ताव मंजुरीसाठी पुन्हा मा.महासभेस सादर करावा. मध्यंतरीच्या काळात अशी दुकाने नियमाकुल करण्यात येवु नयेत.

३. शहरातील काही वैद्यकिय व्यावसायिकांनी रहिवासी वापरासाठी महानगरपालिकेची परवानगी घेवुन प्रत्यक्षात त्यांचा इस्पितळासाठी वापर सुरू केला आहे. ही बाब योग्य नाही. मात्र शहरातील नागरिकांना अशा इस्पितळांमुळे चांगली वैद्यकिय सुविधा मिळत असल्याने अशा वापरातील बदल कलम १४३ अन्वये नियमाकुल करता येईल किंवा कसे याबाबत प्रस्ताव महानगरपालिकेच्या शिफारशीसह शासनास सादर करावा. व शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यावर तसा प्रस्ताव मा.महासभेस मंजुरीसाठी सादर करावा.

४. शहरात अनेक मोबाईल टॉवर्स विना परवाना उभारण्यांत आलेले आहेत. त्यांचेवर योग्य ती कायदेशिर कारवाई करावी. तसेंच या मोबाईल टॉवरच्या मालकी असणा-या कंपनी कडून ते टॉवर नियमित करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यांना प्रत्येक टॉवर मागे रु.१,५०,०००/- इतका दंड आकारण्यांत यावा.

सुचक : मा.श्री. कृ.द.जाधव
अनुमोदक : मा.श्री. नामदेव पवार.
ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दिनांक : १५-०३-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : श्री.किसन शिवाजी भांगरे, मलेरिया बिगारी यांनी त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ प्रमाणे केलेल्या शिक्षेविरूध्द केलेल्या अर्जावर ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : श्री.किसन शिवाजी भांगरे,मलेरीया बिगारी हे कामावरुन गैरहजर असल्याने त्यांना आस्थापना आदेश क्रमांक २०६१ दिनांक २-९-०४ अन्वये आरोपपत्र क्रमांक २४३१ दिनांक १४-९-०४ ने देण्यात आले ते असे

तुम्ही दिनांक ४/१/२००४ पासून कोणत्याही प्रकारचा रजेचा अर्ज न देता गैरहजर आहात यापुर्वीही तुम्ही दिनांक १३/१/९४ ते २१/४/९९ असे पाच वर्ष गैरहजर होता.एक वेळेस सहानुभूतीपुर्वक क्षमा करुन तुम्हांस कामावर घेतले.परंतू तुमच्या वर्तनात फरक पडलेला नाही.तुम्ही सतत गैरहजर राहातात. त्यामुळे महानगरपालिकेचे कामाची खोटी होते.सदर वर्तन गैरशिस्तीचे व गंभीर बेजबाबदारपणाचे आहे.असे आरोप आरोपीत कामगारावर ठेवणेत आलेले होते.सदर आरोपपत्राच्या खातेनिहाय चौकशीअंती आरोप शाबीत झाल्याने आरोपीत कामगारास जा.क्र.कामगार ३८६४ दिनांक ९-२-०५ अन्वये तुम्हांस मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२)(ग ) अन्वये तुम्ही पुढे नोकरी मिळण्यास अपात्र होणार नाहीत अशा रितीने मनपा सेवेतून कमी करणेत येत आहे.अशी शिक्षा का करणेत येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस दिली.सदर नोटीसीचा खुलासा विचारात घेवून आरोपीत कामगारास दिलेली शिक्षा कायम करणेसाठी मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव प्रकरण ठेवले असता मा.स्थायी समितीने ठराव नंबर ३ दिनांक २९-१०-०५ अन्वये श्री.भांगरे यांना बडतर्फ करणेस मंजुरी दिली.त्याप्रमाणे जा.क्र.आस्थापना ४१७७ दिनांक २०-१-२००६ अन्वये श्री.भांगरे यांना बडतर्फीबाबत कार्या आदेश देण्यात आला.

सदर आदेशाविरुध्द श्री.किसन शिवाजी भांगरे यांनी दिनांक १५-२-२००६ रोजी अपील अर्ज दिलेला असून मी अहमदनगर जिल्हयांतील अकोले तालुक्यातील कोहोणे या अत्यंत दुरगामी खेडयात राहाणारा असून जातीने आदिवासी आहे.माझी आई आजारी पडल्याने तिला मुंबई येथे उपचारासाठी न्यावे लागेल.तेथे उपचारासाठी बराच कालावधी व पैसा लागला.मी घरात एकटा कमवीता असल्याने मला नगर येथील विविध सावकारांकडून व्याजाने पैसे घ्यावे लागले.दरम्यान माझे आईचे निधन झाले.सावकारांच्या धाकाने मी कामावर हजर नव्हतो.त्यामुळे सदरची चुक ही मी जाणूनबजूण केलेली नाही.२ ते ३ वेळा सावकारांकडून मला मारहाणसुध्दा झाली.त्यामुळे देखील मी कामावर हजर राहू शकलो नाही.सदरची चुक माझेकडून झालेली आहे.त्याबद्यल मी माफी देखील मागीतलेली आहे.परंतू त्याबदल्यात मला देण्यात आलेली शिक्षा ही फार जास्त आहे.त्यामुळे माझेवर व माझे कुटुंबीयावर उपासमारीची वेळ आलेली आहे.भविष्यात अशा प्रकारची चुक माझेकडून होणार नाही याची मी दक्षता घेणार आहे.

सदरचा अपील अर्ज हा मी मुदतीत सादर केलेला असून त्यास नियमानुसार कोर्ट फी स्टॅम्प लावलेला आहे.तरी मला दिलेली शिक्षा कमी करुन मला कामावर हजर करुन घ्यावे अशी विनंती केलेली आहे.

आरोपीत कामगाराने सादर केलेला अपील अर्ज हा मुदतीत सादर केलेला असून त्यास कोर्ट फी स्टॅम्प लावलेला आहे. मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये बडतर्फी विरुध्द अपील दाखल करणेची तरतूद असून सदरच्या अपील अर्जावर निर्णय घेण्यासाठी मा.सर्व साधारण सभा सक्षम आहे.

येणेप्रमाणे अहवाल निर्णयास्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अधिनियम कलम ५६(४) नुसार अपील अर्ज निर्णयासाठी मा.सर्व साधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे.आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, कामगार अधिकारी आणि उपायुक्त यांनी अपीलांतील मुददयांबाबत स्पष्ट अभिप्राय नोंदवून फेरसादर करावे.

फेरसादर,

श्री.किसन शिवाजी भांगरे,मले बिगारी यांना त्यांचे वरील खातेनिहाय चौकशीकामी त्यांचा प्रदिर्घ गैरहजर कालावधी तसेच सतत गैरहजेरीचे वर्तन व बेजबाबदारपणा विचारात घेवून मा.आयुक्त यांनी त्यांना मनपा अधिनियम १९४९ चे कजम ५६(२) (ग ) अन्वये नोकरीतून कमी करण्याची शिक्षा प्रस्तावीत केली.त्यास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३ दिनांक २९-१०-२००५ अन्वये अंतीम मंजुरी मिळून त्यानुसार श्री.भांगरे यांना आस्था जा.क्र.४१७७ दिनांक २०-१-२००६ ने नोकरीतून कमी करणेबाबत आदेश बजावण्यात आला.

या निर्णयावर श्री.भांगरे यांनी मुदतीत व रितसर अपील अर्ज दाखल केलेला आहे.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) मध्ये अपीलाची तरतूद असून त्यानुसार त्यांनी सदर अर्ज दाखल केलेला आहे अपील अर्जामध्ये गैरहजेरीची कारणे देतांना त्यांनी मी दुर्गम भागातील आदिवासी आहे.घरची आर्थीक परिस्थिती बिकट असल्याने व आई सतत आजारी होती व तद्नंतर तिचे निधन झाले.यामध्ये झालेला कर्जबाजारी पणा व त्यामध्ये सतत होणारा नगर येथील सावकारांचा त्रास ,मारहाण,शिवीगाळ इ.मुळे कामावर येणे अवघड झाले ही कारणे दिली आहेत मात्र याबाबत त्यांनी कुठलाही ठोस पुरावा अथवा सबब पुरावा दिलेला नाही.यास्तव त्यांना देण्यात आलेली शिक्षा योग्य आहे.

तरी उपरोक्त परिस्थितीत श्री.भांगरे,मलेरीया बिगारी यांचा अपील अर्ज निर्णयास्तव ठेवीला असे

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की,अहवालानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,दिर्घ कालावधीची अनुउपस्थिती सेवेतील विनापरवाना गैरहजेरी ही गंभीर गैरशिस्त असून ही कामांतील गंभीर कसूर आहे अपीलातील मुद्दे संयुक्तीक वाटत नाहीत.

यावर मा.महापौर यांचा अभिप्राय की, चर्चा करा

यावर मा.महापौर यांचा अभिप्राय की,चर्चा झाली सध्या कार्यरत मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणून फेरसादर करा.

फेरसादर,

सदर प्रकरणी श्री.किसन शिवाजी भांगरे (मलेरीया बिगारी ) यांना विभागीय चौकशीतून मा.स्थायी समितीने ठराव नंबर ३ दिनांक २९-१०-२०५ अन्वये नोकरीत कमी करण्याची शिक्षा झ ालेली आहे.त्यानुसार त्यांना आस्था जा.क्र.४१७७ दिनांक २१-१-२००६ अन्वये आदेश बजाविला आहे.

सदर शिक्षेविरुध्द श्री.भांगरे (मलेरीया बिगारी ) यांनी मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) अन्वये मुदतीत अपील अर्ज दिलेला आहे.त्यावर तत्कालीन मा.आयुक्त यांचे अभिप्रायासह प्रकरण मा.सर्व साधारण सभेपुढे ठेवणेसाठी दिले असता मा.महापौर साहेब यांचेशी चर्चा होवून सध्या कार्यरत मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणून फेरसादर करा अशा आदेशानुसार प्रकरण फेरसादर केले आहे.

सदर प्रकरणी अपीलाचा निर्णय कायदयानुसार होणे महत्वाचे आहे.सद्यस्थितीत प्रकरण प्रलंबीत आहे.तरी सदर प्रकरणी मा.सर्व साधारण सभेपुढे निर्णयास्तव प्रकरण मा.महापौर साहेब यांचे मार्फत फेरसादर करणेकामी आदेश होणेस विनंती आहे.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मनपा मानद कायदेशीर सल्लागार यांचे मतासह सादर करा

फेरसादर,

सदर प्रकरणी मा.महापौर यांनी दिलेल्या आदेशानुसार मनपा विधीज्ञ श्री.एस.के.पाटील यांचे कायदेशीर मत घेणेकामी जा.नं लेबर ३१९४ दिनांक २६-१२-२००७ अन्वये पत्र दिले असता त्यांनी दिनांक ४/२/२००८ रोजी कायदेशीर मत दिले त्याचा सारांश असा " संबंधीत कामगारास खातेनिहाय चौकशी पुर्ण होवून आरोप शाबीत झाल्यावरच सेवेतून कमी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.सदरच्या निर्णयाविरुध्द मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) अन्वये सर्वसाधारण सभेपुढे अपीलाची तरतूद असल्याने संबंधीत कामगारांनी अपील केले आहे व सर्व साधारण सभेस त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार आहे.कामगाराचा गैरहजर कालावधी पहाता त्यास झालेली शिक्षा योग्य आहे तथापी अंतीम निर्ण.य मा.सर्व साधारण सभेने घेणे उचीत होईल" असे मत दिले आहे.

येणेप्रमाणे कायदेशीर मतासह मा.सर्व साधारण सभेपुढे सादर करणेत आदेशार्थ.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की,प्रस्तावीत नुसार मा.महासभेसमोर अंतीम निर्णय घेणेकरीता प्रकरण पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफीस रिपोर्ट ,मा.उपायुक्त (सा ), मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह व कामगार अधिकारी यांचे फेरसादर रिपोर्टासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--**--

चर्चा :

मा.श्री.वाकळे - सदर कर्मचा-यांना त्यांचे वयाचा व नोकरीचा विचार करुन त्यांना पुनःश्च नोकरीवर घेण्यात यावे.

मा.श्री.कानडे - सदर कर्मचा-यांच्या वयाचा विचार करुन त्यांना माफ करुन कामावर घेण्यात यावे.

मा.श्री.आगरकर - सदर दोन्ही कर्मचा-यांना कामाची जरुरी दिसुन येत नाही. ते कशामुळे गैरहजर होते. याचे रेकॉर्ड काहीही आलेले नाही. त्यामुळे अशा कर्मचारी हे गैरहजेरी बाबत स्वतःच जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांना कामावर घेतल्यास कोणत्याही इतर कर्मचा-यांना धाक रहाणार नाही याचा काही विचार करणार आहात किंवा नाही. व कोणतेही कर्मचारी महानगरपालिके मध्ये काम करणार नाहीत. कामाची खोटी करुन कर्मचारी गैरहजर रहातात त्यामुळे नागरीक त्यांच्या सेवासुविधां पासुन मुकतात. वर्षानुर्षे कर्मचारी गैरहजर रहात असल्याने नागरिकांची हेळसांड होत असेल तर आपण त्यांना माफ करु शकणार नाही.

मा.श्री.उडाणशिवे - सदर कर्मचारी हे मागासवर्गातील आहेत त्यांना कामाची माहिती नाही. याबाबत सर्वतोपरी विचार करुन त्यांना कामावर घेण्यांत यावे

त्यामुळे सभागृहात गोंधळाचे वातावरण तयार होवुन सदस्य सर्वश्री.नामदेव पवार, आसाराम कावरे, अशोक कानडे इ. सदस्य एकदम उभे राहुन भाषण करु लागले व त्यांनी भाषण सुरु ठेवले.

मा.श्री.कृ.द.जाधव - सदर कर्मचा-यांवर सर्वतोपरी नियमानुसार कार्यवाही करुन आता त्यांनी दयेसाठीचा अर्ज आपणांकडे सादर केला आहे. त्यामुळे त्यांचा विचार करावा.

मा.श्री.दिप चव्हाण - कर्मचारी कोणत्या विभागात काम करीत होते. त्यांचा विभाग कोणता आहे. व त्यांना महानगरपालिकेच्या सर्व सेवा शर्ती लागु होतात काय ?

मा.श्री.गिरवले - सदर कर्मचा-यांना यापुर्वी संधी दिलेली होती. परंतु ते कामावर हजर झालेले नाहीत. व त्यांच्याकडे पाहिले असता ते शारीरीक काम करण्याच्या परिस्थितीत नाहीत त्यामुळे त्यांना कामावर घेण्यांत येवु नये.

मा.श्री.नामदेव पवार - सदर कर्मचा-यांना महानगरपालिका सभेपुढे अपिल करण्याचा अधिकार आहे. तर मग निर्णय घेण्याचा अधिकार सभागृहास नाही काय ?

प्रभारी आयुक्त - याबाबत महानगरपालिका सभेपुढे प्रस्ताव आलेला आहे याबाबत जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो घेवू शकता.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर . नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. अभय आगरकर

अनुमोदक : मा.श्री. कैलास गिरवले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ८ दिनांक : १५-०३-२००८.

---

प्रस्तावाचा विषय : श्री.काशीनाथ नारायण धिंदले , मलेरिया बिगारी यांनी त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ प्रमाणे केलेल्या शिक्षेविरूध्द केलेल्या अर्जावर ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : श्री.काशिनाथ नारायण धिंदले, मलेरीया बिगारी हे कामावरुन गैरहजर असल्याने त्यांना आस्थापना आदेश क्रमांक २०६१ दिनांक २-९-०४ अन्वये आरोपपत्र क्रमांक २४३२ दिनांक १४-९-०४ ने देण्यात आले ते असे.

तुम्ही दिनांक ५/११/२००२ पासून कोणत्याही प्रकारचा रजेचा अर्ज न देता गैरहजर आहात यापुर्वीही तुम्ही दिनांक ०५/०३/९४ ते २००० अखेर पाच वर्ष दहा महिने गैरहजर होता. एक वेळेस सहानुभूतीपुर्वक क्षमा करुन तुम्हांस कामावर घेतले.परंतू तुमच्या वर्तनात फरक पडलेला नाही. तुम्ही सतत गैरहजर राहातात. त्यामुळे महानगरपालिकेचे कामाची खोटी होते.सदरचे वर्तन गैरशिस्तीचे व गंभीर बेजबाबदारपणाचे आहे.असे आरोप आरोपीत कामगारावर ठेवणेत आले होते. सदर आरोपपत्राच्या खातेनिहाय चौकशीअंती आरोप शाबीत झाल्याने आरोपीत कामगारास जा.क्र.कामगार ३८६६ दिनांक ९-२-०५ अन्वये तुम्हांस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२)(ग ) अन्वये तुम्ही पुढे नोकरी मिळण्यास अपात्र होणार नाहीत अशा रितीने मनपा सेवेतून कमी करणेत येत आहे. अशी शिक्षा का करणेत येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस दिली. सदर नोटीसीचा खुलासा विचारात घेवून आरोपीत कामगारास दिलेली शिक्षा कायम करणेसाठी मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव प्रकरण ठेवले असता मा.स्थायी समितीने ठराव नंबर ३ दिनांक २९-१०-०५ अन्वये श्री.धिंदले यांना बडतर्फ करणेस मंजुरी दिली. त्याप्रमाणे जा.क्र.आस्थापना ४१७६ दिनांक २०-१-२००६ अन्वये श्री.धिंदले यांना बडतर्फीबाबत कार्या. आदेश देण्यात आला.

सदर आदेशाविरुध्द श्री.काशिनाथ नारायण धिंदले यांनी दिनांक ३१-१-२००६ रोजी अपील अर्ज दिलेला असून, " मी अहमदनगर जिल्हयांतील अकोले तालुक्यातील धामणगांव या अत्यंत दुरगामी खेडयात राहाणारा असून जातीने आदिवासी आहे. माझे घरची परिस्थीती अत्यंत बिकट असून माझे घरात मी कर्ता आहे. माझी आई वयस्कर असुन नेहमी आजारी असते. कुटुंबात एकूण ६ माणसे असून त्या सर्वांची पालनपोषणाची जबाबदारी माझेवर आहे. नोकरीशिवाय उत्पन्नाचे दुसरे साधन नाही. शेतीपण नाही. सदर पगारामध्ये कुटुंब चालविणे कठीण होते. आई आजारी असल्याने लोकांचे उसनवार व व्याजाने घेतलेले कर्ज जास्त झाले आहे. सदर कार्यवाही चालू असतांना पगार बंद होता. त्यामुळे पैसे देणारी माणसे पैसे परत न केल्यामुळे मला ऑफिसला येतांना रस्त्यावर अडवून धमक्या व शिवीगाळ करीत होते. त्यामुळे मी कामावर येवू शकत नव्हतो. काही माणसे ऑफिसमध्ये येवून पैसे मागत होती. त्यामुळे माझा नाईलाज झाला. म्हणुन मला दुस-या गावी तोंड लपवावे लागले. अन्यथा लोकांनी मला मारहाण केली असती. आपण दिनांक २०/१/२००६ रोजीच्या पत्रात बडतर्फे केले आहे. मला उत्पन्नाचे साधन फक्त नोकरीच आहे. त्यामुळे माझे कुटुंबियावर उपासमारीची वेळ आलेली आहे. व मला आता आत्महत्येशिवाय पर्याय राहीलेला नाही. आपण माझेवर जे काही आरोप केलेले असून माफी मागीतलेली आहे तरीपण आपण मला दिलेली शिक्षा ही जास्त होत आहे. तरी सदरची शिक्षा कमी करुन मला पुर्वीप्रमाणे कामावर घ्यावे." अशी विनंती केलेली आहे.

आरोपीत कामगाराने सादर केलेला अपील अर्ज हा मुदतीत सादर केलेला असून त्यास कोर्ट फी स्टॅम्प लावलेला आहे. मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये बडतर्फी विरुध्द अपील दाखल करणेची तरतूद असून सदरच्या अपील अर्जावर निर्णय घेण्यासाठी मा.सर्व साधारण सभा सक्षम आहे.

येणेप्रमाणे अहवाल निर्णयास्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, कलम ५६(४) अन्वये कठोर शिक्षेच्या बाबतीत स्थायी समितीच्या निर्णयावर अपिल मा.सर्वसाधारण सभा हे वरिष्ठ प्राधिकरण असल्याने त्यांचेकडे करता येईल. त्यामुळे अपिल निर्णयासाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवता येईल. आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अपिला बाबत कामगार अधिकारी व उपायुक्त यांनी स्पष्ट अभिप्राय नोंदवून फेरसादर करावे.

फेरसादर,

श्री.काशिनाथ ना.धिंदले,मले बिगारी यांना त्यांचे वरील खातेनिहाय चौकशीकामी त्यांचा प्रदिर्घ गैरहजर कालावधी तसेच सतत गैरहजेरीचे वर्तन व बेजबाबदारपणा विचारात घेवून मा.आयुक्त यांनी त्यांना मनपा अधिनियम १९४९ चे कजम ५६(२) (ग ) अन्वये नोकरीतून कमी करण्याची शिक्षा प्रस्तावीत केली. त्यास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३ दिनांक २९-१०-२००५ अन्वये अंतीम मंजुरी मिळून त्यानुसार श्री.धिंदले यांना आस्था जा.क्र.४१७६ दिनांक २०-१-२००६ ने नोकरीतून कमी करणेबाबत आदेश बजावण्यात आला.

या निर्णयावर श्री.धिंदले यांनी मुदतीत व रितसर अपील अर्ज दाखल केलेला आहे. मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) मध्ये अपीलाची तरतूद असून त्यानुसार त्यांनी सदर अर्ज दाखल केलेला आहे. अपील अर्जामध्ये गैरहजेरीची कारणे देतांना त्यांनी मी आईचे आजारपण, त्यामुळे आलेला कर्जबाजारीपणा त्यातून सावकारांचा त्रास तसेच घरची बिकट आर्थिक परिस्थिती इ.कारणे दिली आहेत. मात्र याबाबत त्यांनी कुठलाही ठोस अथवा सबळ पुरावा दिलेला नाही. यास्तव त्यांना देण्यात आलेली शिक्षा योग्य आहे.

तरी उपरोक्त परिस्थितीत श्री.धिंदले, (मलेरीया बिगारी) यांचा अपील अर्ज निर्णयास्तव ठेवीला असे

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की,अहवालानुसार आदेशार्थ फेरसादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, दिर्घ कालावधीची कामावरील विनापरवाना अनुउपस्थिती ही गंभीर गैरशिस्त असून ती सेवेतील गंभीर कसूर आहे अपीलातील मुद्ये संयुक्तीक वाटत नाहीत.

यावर मा.महापौर यांचा अभिप्राय की, कामगार अधिकारी समक्ष चर्चा करा

यावर मा.महापौर यांचा अभिप्राय की, चर्चा झाली सध्या कार्यरत मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणून फेरसादर करा.

फेरसादर,

सदर प्रकरणी श्री.काशिनाथ धिंदले (मलेरीया बिगारी ) यांना विभागीय चौकशीतून मा.स्थायी समितीने ठराव नंबर ३ दिनांक २९-१०-२००५ अन्वये नोकरीतून कमी करण्याची शिक्षा झालेली आहे. त्यानुसार त्यांना आस्था जा.क्र.४१७६ दिनांक २१-१-२००६ अन्वये आदेश बजाविला आहे.

सदर शिक्षेविरुध्द श्री.धिंदले (मलेरीया बिगारी ) यांनी मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) अन्वये मुदतीत अपील अर्ज दिलेला आहे. त्यावर तत्कालीन मा.आयुक्त यांचे अभिप्रायासह प्रकरण मा.सर्व साधारण सभेपुढे ठेवणेसाठी दिले असता मा.महापौर साहेब यांचेशी चर्चा होवून " सध्या कार्यरत मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणून फेरसादर करा " अशा आदेशानुसार प्रकरण फेरसादर केलेले आहे.

सदर प्रकरणी अपीलाचा निर्णय कायदयानुसार होणे महत्वाचे आहे. सद्यस्थितीत प्रकरण प्रलंबीत आहे. तरी सदर प्रकरणी मा.सर्व साधारण सभेपुढे निर्णयास्तव प्रकरण मा.महापौर साहेब यांचे मार्फत फेरसादर करणेकामी आदेश होणेस विनंती आहे.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मनपा मानद कायदेशीर सल्लागार यांचे मतासह सादर करा

फेरसादर,

सदर प्रकरणी मा.महापौर यांनी दिलेल्या आदेशानुसार मनपा विधीज्ञ श्री.एस.के.पाटील यांचे कायदेशीर मत घेणेकामी जा.नं लेबर ३१९४ दिनांक २६-१२-२००७ अन्वये पत्र दिले असता त्यांनी दिनांक ४/२/२००८ रोजी कायदेशीर मत दिले त्याचा सारांश असा " संबंधीत कामगारास खातेनिहाय चौकशी पुर्ण होवून आरोप शाबीत झाल्यावरच सेवेतून कमी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयाविरुध्द मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) अन्वये सर्वसाधारण सभेपुढे अपीलाची तरतूद असल्याने संबंधीत कामगारांनी अपील केले आहे व सर्व साधारण सभेस त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार आहे. कामगाराचा गैरहजर कालावधी पहाता त्यास झालेली शिक्षा योग्य आहे तथापी अंतीम निर्णय मा.सर्व साधारण सभेने घेणे उचीत होईल" असे मत दिले आहे.

येणेप्रमाणे कायदेशीर मतासह मा.सर्व साधारण सभेपुढे सादर करणेस आदेशार्थ

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" नुसार मा.महासभेसमोर अंतीम निर्णय घेणेकरीता प्रकरण पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सभा प्रस्तावित मान्य.

अशाबाबतचा ऑफीस रिपोर्ट ,मा.उपायुक्त (सा ), मा.आयुक्त सो, मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह व कामगार अधिकारी यांचे फेरसादर रिपोर्टसह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--**--

चर्चा :

मा.श्री.वाकळे - सदर कर्मचा-यांना त्यांचे वयाचा व नोकरीचा विचार करुन त्यांना पुन:श्च नोकरीवर घेण्यात यावे.

मा.श्री.कानडे - सदर कर्मचा-यांच्या वयाचा विचार करुन त्यांना माफ करुन कामावर घेण्यात यावे.

मा.श्री.आगरकर - सदर दोन्ही कर्मचा-यांना कामाची जरुरी दिसुन येत नाही. ते कशामुळे गैरहजर होते. याचे रेकॉर्ड काहीही आलेले नाही. त्यामुळे अशा कर्मचारी हे गैरहजेरी बाबत स्वत:च जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांना कामावर घेतल्यास कोणत्याही इतर कर्मचा-यांना धाक रहाणार नाही याचा काही विचार करणार आहात किंवा नाही. व कोणतेही कर्मचारी महानगरपालिके मध्ये काम करणार नाहीत. कामाची खोटी करुन कर्मचारी गैरहजर रहातात त्यामुळे नागरीक त्यांच्या सेवासुविधां पासुन मुकतात. वर्षानुर्षे कर्मचारी गैरहजर रहात असल्याने नागरिकांची हेळसांड होत असेल तर आपण त्यांना माफ करु शकणार नाही.

मा.श्री.उडाणशिवे - सदर कर्मचारी हे मागासवर्गातील आहेत त्यांना कामाची माहिती नाही. याबाबत सर्वतोपरी विचार करुन त्यांना कामावर घेण्यांत यावे

त्यामुळे सभागृहात गोंधळाचे वातावरण तयार होवुन सदस्य सर्वश्री.नामदेव पवार, आसाराम कावरे, अशोक कानडे इ. सदस्य एकदम उभे राहुन भाषण करु लागले व त्यांनी भाषण सुरु ठेवले.

मा.श्री.कृ.द.जाधव - सदर कर्मचा-यांवर सर्वतोपरी नियमानुसार कार्यवाही करुन आता त्यांनी दयेसाठीचा अर्ज आपणांकडे सादर केला आहे. त्यामुळे त्यांचा विचार करावा.

मा.श्री.दिप चव्हाण - कर्मचारी कोणत्या विभागात काम करीत होते. त्यांचा विभाग कोणता आहे. व त्यांना महानगरपालिकेच्या सर्व सेवा शर्ती लागु होतात काय ?

मा.श्री.गिरवले - सदर कर्मचा-यांना यापुर्वी संधी दिलेली होती. परंतु ते कामावर हजर झालेले नाहीत. व त्यांच्याकडे पाहिले असता ते शारीरीक काम करण्याच्या परिस्थितीत नाहीत त्यामुळे त्यांना कामावर घेण्यांत येवु नये.

मा.श्री.नामदेव पवार - सदर कर्मचा-यांना महानगरपालिका सभेपुढे अपिल करण्याचा अधिकार आहे. तर मग निर्णय घेण्याचा अधिकार सभागृहास नाही काय ?

प्रभारी आयुक्त - याबाबत महानगरपालिका सभेपुढे प्रस्ताव आलेला आहे याबाबत जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो घेवू शकता.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर . नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. अभय आगरकर

अनुमोदक : मा.श्री. कैलास गिरवले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ९ दिनांक : १५-०३-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : दि.७-१२-२००६ चे शासन निर्णयानुसार सिस्टीम मॅनेजर व संगणक प्रोग्रॅमर या पदावर पदोन्नती देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांनी दिनांक ७ डिसेंबर २००६ च्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना सुचीवर सिस्टीम मॅनेजर -१ पद व संगणक प्रोग्रॅमर -१ पद अशा दोन नविन पदे निर्मीती करण्यास मंजुरी दिलेली आहे.

शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या संगणकीकरणाच्या परिपत्रकानुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील संपुर्ण कामकाज हे संगणकाद्वारे करणेस महानगरपालिकेकडील कायम कर्मचारी श्री.अंबादास देविदास साळी-नाका लिपीक व श्री.दिनेश गिरीधरदास गांधी-नाका लिपीक यांचा अनुक्रमे MCM (मास्टर इन कॉमप्युटर मॅनेजमेंट ) व DCM (डिप्लोमा इन कॉम्प्युटर मॅनेजमेंट / प्रोग्रॅमर ) असा संगणक क्षेत्रातील कोर्स झालेला असल्याने त्यांनी सन २००३ पासून अहमदनगर महानगरपालिकेचे १.मालमत्ता फेरमुल्यांकन २.मालमत्ताच्या सर्व नोंदी व संगणकाद्वारे मालमत्ता धारकांना घरपटटीची बीले ३.आस्थापना वरील सर्व कर्मचा-यांचे पगारबीले व त्या संबंधीची संपुर्ण माहिती ४.महानगरपालिकेतील मागील १० वर्षाचे जन्म-मृत्यू चे नोंदी व दैनदिन जन्म-मृत्यू दाखले संगणकाद्वारे देणे ५.जमा-खर्च वर्गीकरण नोंदवही ६.भविष्य निर्वाह निधीचे नोंदी ७.ठेकेदार सप्लायर्स यांचे व इतर आयकर विक्रीकर बाबतचे रिटर्न व प्रमाणपत्र इत्यादी प्रकारच्या संगणक आज्ञावल्या वरील दोन्ही कर्मचारी यांनी स्वत: तयार (Develop ) केलेल्या आहेत.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना सुचीवर सिस्टीम मॅनेजर व संगणक प्रोग्रॅमर ही दोन्ही पदे मंजूर नसल्याने संबंधीत कर्मचा-यांना नाका लिपीक या पदावर रुपये ३०५०-४५९० या वेतनश्रेणीतच वेतन देवून सदरचे काम करुन घेण्यात आले व येत आहे महानगरपालिकेकडे सध्या ४६ संगणक आहेत व ते विविध विभागात असून त्याद्वारे महानगरपालिकेचे दैनदिन कामकाज कार्यरत आहे.महानगरपालिकेने विविध ज्या कार्यप्रणाली (आज्ञावली ) तयार केलेली आहे त्यासाठी काहीही खर्च न करता संबधीत वरील दोन कर्मचा-याकडून करुन घेण्यात आलेल्या आहेत.सदरचे सर्व कार्यप्रणाली ही बाहेरील संस्थेमार्फत करुन घ्यावयाची असती तर त्यासाठी अंदाजे रुपये ४० -५० लक्ष इतका खर्च करावा लागला असता व दैनदिन कामकाजासाठी प्रत्येक वेळेस संगणक आज्ञावलीमध्ये बदल करावा लागला असता तर बाहेरील संस्थेवर अवलंबून रहावे लागले असते.

विविध ठिकाणी महानगरपालिकेचे संगणक कार्यप्रणालीचा केलेला खर्च व कार्य पहाता अहमदनगर महानगरपालिकेने स्वत: तयार केलेल्या आज्ञावल्या वापरण्यास योग्य अशा आहेत.

अहमदनगर महानगरपालिकेची सेवाजेष्ठता यादी पहाता एम.सी.एम व डी.सी.एम अशा संगणक क्षेत्रातील कोर्सवरील दोन कर्मचा-याशिवाय इतर कर्मचा-यांकडे नाही.

वरील दोन्ही पदाचे पदनिर्मीतीचे प्रस्तावामध्ये सिस्टीम मॅनेजर म्हणून श्री.अंबादास देविदास साळी व श्री.दिनेश गिरीधरदास गांधी यांची नियुक्ती करणेबाबत नावानिशी ठराव झालेला आहे.तसेच अहमदनगर महानगरपालिकेने पाठविलेल्या दिनांक ११/११/२००६ च्या प्रस्तावामध्ये सन २००६-२००७ मध्ये कोर्ट निर्णयानुसार नेमलेल्या कर्मचा-यापैकी ७ पदे रिक्त होत असून ती पदे रिक्त झाल्यानंतर व्यपगत होणार आहेत त्यामुळे आस्थापना खर्च ०.१०% ने कमी होणार आहेया खुलाशानंतरच मा.शासनाने सदर पदांना मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब दिनांक १३-३-२००७ अन्वये पदोन्नतीतील आरक्षण पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागू करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.तसेच सदर आदेशामध्ये पदोन्नती देतांना न्यायालयाच्या निर्णयास अधीन राहून पदोन्नती द्यावी लागेल असे निर्देश दिलेले आहेत.

शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाचा विचार करता श्री.अंबादास देविदास साळी व श्री.दिनेश गिरीधरदास गांधी यांना अनुक्रमे सिस्टीम मॅनेजर वेतनश्रेणी रुपये ६५००-१०५०० व संगणक प्रोग्रॅमर वेतनश्रेणी रुपये ५५००-९००० मध्ये पदोन्नती देणेस योग्य होईल सबब आदेशार्थ.

यावर अंतर्गत लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की,मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१,५२,५३ व ५४ प्रमाणे मा.निवड समितीने निर्णय घेणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार मान्यतेस हरकत नाही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,ठराव सादर करावा.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, या सोबत मा.स्था.स.ठ.नंबर ७ दिनांक १४-८-०४ ची प्रत अवलोकनार्थ सादर केली आहे.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार अवलोकनार्थ व आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, शासनाचे मार्गदर्शन मागविणे कारण मंजूरी फक्त विहीत पध्दतीनेच भरती करावी असे नमुद आहे.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा फेरसादर रिपोर्ट की, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मुंबई यांनी दि. ७ डिसेंबर,२००६ च्या आदेशान्वये उपरोक्त वरील दोन पदांना अहमदनगर महानगरपालिका कायम आस्थापना सूचीवर मंजूरी दिलेली आहे.त्यानुसार दि. १५ मार्च,२००७ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला असता मंजुरी आदेशात विहीत पध्दतीने पदे भरावीत असे नमुद असल्याने शासनामार्फत मार्गदर्शन मागवावे असे आदेश मा.आयुक्तसाहेब यांनी दिले आहे.त्यानुसार १) आस्थापना जा क्रं. ९०५ दि. १९ जुन,२००७ , २) आस्था जा क्रं. १७४४ दि. ९ जुलै,२००७ अन्वये मा.उपसचिव,नगरविकास विभाग नवि-२४ मुंबई यांना मार्गदर्शन मिळणेबाबत पत्र देण्यात आले. अद्यापावेतो शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही. दरम्यानच्या काळात मास्टर इन कॉमप्युटर मॅनेजमेंट(MCM), संगणक मधील पदवी(BCS),संगणक आभियंत्रीकी पदवी (BE Computer), शासन मान्य संस्थेचा (DOEACC-O) कोर्स पास किंवा डिप्लोमा इन कॉमप्युटर मॅनेजमेंट (DCM) किंवा डिप्लोमा इन कॉमप्युटर प्रोग्रॅमिंग (DCP) अशी शैक्षणिक पात्रता धारण करीत असले बाबत कार्यालयीन परिपत्रक आस्था जा क्रं. २८१९ दि. २६ नोव्हेंबर,२००७ अन्वये माहिती मागविण्यात आली त्यानुसार सदर शैक्षणिक पात्रता धारण करणारे कोणतेही कर्मचारी हे श्री अंबादास देवीदास साळी व श्री दिनेश गिरीधरदास गांधी यांचेपेक्षा सेवाजेष्ठ नाहीत.सदरचो दोन पदे एकाकी असल्याने या पदांना आरक्षण लागु होत नाही.

मा .स्थायी समिती सभा क्रं. ७ विषय क्रं व ठराव क्रं .१० दि. १४ ऑगस्ट, २००४ अन्वये उपरोक्त दोन पदांकरिता श्री गांधी दिनेश व श्री अंबादास साळी यांचे नावे शिफारस करुन ठराव पारीत करण्यात आलेला आहे.सदरच्या ठरावानुसार प्रस्ताव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मुंबई यांचेकडे पाठविला असता नगरविकास विभाग क्रं. अमपा १००५/प्र.क्रं.६३/नवि-२४ दिनांक ७ डिसेंबर,२००६ अन्वये सदर दोन पदांना मान्यता दिलेली असून तसा आदेश इकडेस प्राप्त आहे.

वरील सर्व परिस्थिती व शैक्षणिक पात्रता विचारात घेता मा.स्थायी समिती ठराव क्रं १० दि.१४ ऑगस्ट,२००४ नुसार सिस्टीम मॅनेजर या पदी श्री साळी अंबादास देविदास व संगणक प्रोग्रॅमर या पदी श्री गांधी दिनेश गिरीधरदास हे सदर पदाकरीता शैक्षणिक दृष्टया पात्र ठरत असल्याने त्या बाबतचा निर्णय मा.महासभेपुढे घेऊन त्या निर्णयानुसार नियुक्ती करणे उचित वाटते.

आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित महासभेसमोर निर्णयासाठी सादर करणेस मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, आयुक्तांच्या मताशी सहमत. महासभेपुढे ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट अंतर्गत लेखा परिक्षक, मा.उपायुक्त (सा) , मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह व सहाय्यक आयुक्त यांचे फेरसादर रिपोर्टसह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

-- * --

चर्चा :

सदर विषय मंजूर करणे बाबत सर्व श्री.अभय आगरकर, संजय चोपडा, विनीत पाऊलबुधे, कृ.द.जाधव यांनी सुचविले.

मा.श्री.गिरवले - विहित पध्दतीचा अवलंब करुन भरती करण्याबाबत विरोध नाही. मात्र विहित पध्दत म्हणजे कशी याचा नियम तुमच्या पध्दतीने होणार आहेत काय ? याबाबतचा खुलासा करावा.

यावर सहाय्यक आयुक्त यांनी याबाबतचा खुलासा सादर केला.

मा.श्री.गिरवले - श्री.इथापे यांचे बाबत सुध्दा महानगरपालिका सभेने ठराव केला असतांनाही त्यांना पदोन्नती का देण्यांत आली नाही.

मा.श्री.दिप चव्हाण - इतरही बरीच पदे रिक्त आहेत याबाबत काय कारवाई करण्यांत आली याची माहिती मिळावी. तसेच महानगरपालिके मध्ये नगरसचिव हेही अत्यंत महत्वाचे आहे ते पद रिक्त आहे काय ?

प्रभारी आयुक्त - महानगरपालिके मध्ये सध्या बरीच पदे रिक्त आहेत त्याबाबतचा आढावा घेतला आहे. याबाबत पदे भरतांना कर्मचा-यांची सेवाजेष्ठता व त्यांचे गोपनीय अहवाल इ. पुढील कार्यवाही करणार आहे. व जे कर्मचारी पात्र आहेत त्यांचा पदोन्नती करीता विचार करण्यांत येणार आहे.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट व साधक - बाधक झालेल्या चर्चेनुसार मा.शासन निर्णय क्रमांक मनपा १००५ / प्र.क्र.६१ नवि २४ मंत्रालय, मुंबई ३२ ७ डिसेंबर २००६ व ऑफिस रिपोर्ट नुसार सिस्टीम मॅनेजर व संगणक प्रोग्रामर या पदावर पदोन्नती देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी. तसेच मा.शासन निर्णय दि.७-१२-२००६ व पदोन्नती आदेश प्राप्तता या कालावधीमधील वेतन तफावती बाबतचा फरक व इतर नियमाप्रमाणे होणारी देयके अदा करण्यांस देखील ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजुर.

ब) श्री.सुरेश इथापे , सिव्हील ड्रॉप्समन यांनी अनेक वर्ष महानगरपालिकेकडे केलेल्या कामाचा विचार करता तसेच मा.न्यायालयाकडे त्यांनी केलेल्या तक्रारींचा देखील विचार करता तसेच यापुर्वी वेळोवेळी सभेमध्ये झालेल्या चर्चा विचारात घेता श्री.इथापे यांना सिव्हील ड्रॉप्समन या पदावरून कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती देण्यात यावी. तसेच श्री.इथापे यांनी मा.न्यायालयातील केस काढले नंतर त्यांना पदोन्नती आदेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी. खर्च मंजुर.

सुचक : मा.श्री. कृ.द.जाधव.

अनुमोदक : मा.श्री. कैलास गिरवले

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १०　　　　　　　　　　　　　　　　दिनांक : १५-०३-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिका सि.स.नं. १००/१ औरंगाबाद रोड येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे, सुधारित नकाशे व आराखडे , सुधारित किंमत यांना मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : महानगरपालिकेची नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्याच्या रुपये २,६१,०३,९२५/- किंमतीस मा.महासभा ठराव क्रमांक ३ दिनांक २०-३-२००७ अन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे.सदर कामाचे नकाशे व आराखडे मे.कांकरीया ॲड असो.यांना देण्यात आले आहेत.इमारतीचे बांधकाम जकात ठेकेदार मे.सहकार एन्टरप्रायजेस,मुंबई यांचेकडून रुपये १.२५ ते १.५० (२०,००० चौ.फुट ) रकमेचे काम करुन घेण्याचे ठरले आहे.

इमारतीचे बांधकाम शक्य लवकर पुर्ण होण्याच्या दृष्टीने मा.महापौर साहेब,उपमहापौर साहेब,सभापती,स्थायी समिती,आयुक्त ,उपायुक्त (सा) ,सहा.आयुक्त यांचे समवेत आर्किटेक्ट सविस्तर चर्चा करुन नकाशे आराखडयामध्ये काही बदल सुचविले आहेत.सुधारीत प्रस्तावीतील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१.तळमजल्यावर प्रशासन

२.पहिल्या मजल्यावर पदाधिकारी व सभागृह

३.दुसरा मजला भविष्य काळातील बांधकामासाठी तरतूद करुन ठेवणे.

४.बोट हाउस या इमारतीमध्ये १.अतिक्रमण विभाग २.आरोग्य विभाग ३.मुख्य लेखा परिक्षक ४.भांडार विभाग ५.सुवर्ण जयंती शहरी योजना

५.अस्तित्वातील जुन्या इमारतीमध्ये १.कर विभाग २.मोटार व्हेईकल विभाग ३.रेकॉर्ड विभाग ४.क्रिडा विभाग

आज तळ मजला १५२६८ चौ.फुट,पहिला मजला १५२६८ चौ.फुट असे एकूण ३०,५३६ चौ.फुट बांधकाम प्रस्तावित आहे.बोट हाउस मधील ५९८२ चौ.फुटाचे नुतनीकरण प्रस्तावीत आहे.

सुधारीत खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| मुख्य इमारत बांधकाम | रुपये २३३.२५ लक्ष |
| मुख्य इमारत इलेक्ट्रीकल | रुपये १८.६६ लक्ष |
| बोट टाईप हाउस नुतनीकरण | रुपये २०.१९ लक्ष |
| मुख्य इमारत फर्नीचर व इंटेरीयर | रुपये ९६.८८ लक्ष |
| बोट हाउस फर्निचर व इंटेरीयर | रुपये ११.९६ लक्ष |
| इमारत शुशोभिकरण ,पार्कीग इ. | रुपये १५.०० लक्ष |
| एकूण रुपये | रुपये ३९५.८४ लक्ष SAY -- ३९६ लक्ष |
| आर्किटेक्ट फी अंदाजे | रुपये ७.०० लक्ष |
| एकूण रुपये | रुपये ४०३.०० लक्ष |

वरीलप्रमाणे सदर कामासाठी अंदाजे एकूण रुपये ४०३ लक्ष अपेक्षीत रुपये ४०३-१२५= २७८ लक्ष असून मनपा फंडातून सदर खर्च करावा लागणार आहे.

या प्रस्तावानुसार मा.महासभेची खालील बाबीस मंजूरी आवश्यक आहे.

१.सुधारीत नकाशे व आराखडे

२.सुधारीत किंमत

३.बोट टाईपचे काम हाती घेणेबाबत.

४.उर्वरीत (फर्निचर,इंटेरियर,इलेकट्रीकल ) कामासाठी आर्कीटेक्ट यांची नेमणूक

५.अर्थसंकल्पीय तरतूद होणेबाबत.

मुख्य इमारतीचे उर्वरीत बांधकाम सध्याचे जकात ठेकेदार यांचेकडून करुन घेतल्यास काम लवकर पुर्ण होईल असे वाटते.तसेच उर्वरीत कामासाठी निविदा काढावी असे वाटते.

तरी सोबत सुधारीत नकाशे व सुधारीत किंमतीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.महासभेत ठेवणेस्तव सनिनय सादर.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, मुख्य प्रशासकीय इमारतीचे उर्वरीत काम जकात ठेकेदार यांचेकडून करुन घेणेस हरकत नाही.मार्च २००८ पुर्वी सदरचे काम पुर्ण करुन घेणे आवश्यक राहील.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की, अ प्रस्तावीत नुसार प्रकरण मा.महासभेत ठेवून निर्णय घेणेकरीता मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की,महासभेत घेण्यात यावे.

अशाबाबतचा ऑफीस रिपोर्ट ,मा.शहर अभियंता,मुख्यलेखाधिकारी,मा.उपायुक्त (सा ), मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--**--

चर्चा :

महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारती बाबत शहर अभियंता यांनी खुलासा केला व सध्या जे ठेकेदार काम करीत आहेत त्यांचेकडुनच त्याच रेटमध्ये पुढील काम करुन घेतले गेल्यास पुढील रेटमध्ये वाढ होणार नाही व महानगरपालिकेचा त्यामध्ये फायदा होईल.

मा.श्री.नामदेव पवार - मंजूर. मागील वर्षीच्या डी.एस.आर प्रमाणेच काम होणार असल्याने सदरचे प्रकरण मंजूर होण्यास हरकत नाही.

मा.श्री.गिरवले - सदर बाबत नविन एस्टीमेट मध्ये ॲटम वाईज कोणते रेट आहेत याचा उल्लेख करावा.

--*--

ठराव : प्रशासकीय इमारतीचे बांधकाम मे.सहकार एजन्सी यांनी रूपये १.२५ कोटी रूपयाचे काम वेळेमध्ये व चांगल्याप्रमाणे केले असल्याने उर्वरित इमारतीचे काम त्यांचेकडून करून घेण्यात येईल. सदर काम त्यांनी सन २००६-२००७ चे दराने केलेले आहे. उर्वरित काम चालु दरसुचीनुसार ( सन २००७-०८ ) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुधारित किंमत ४०३ लक्ष रूपयास मान्यता देण्यात येत आहे. तसेच नकाशे व आराखडे यांना मान्यता देण्यात येत आहे. तसेच बोट हाउसचे काम हाती घेण्यास व उर्वरित वास्तुशास्त्रीय कामासाठी मे.कांकरिया अँण्ड असो.यांचे नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. खर्च मंजूर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.नामदेव शांताराम पवार.
अनुमोदक : मा.श्री. अशोक नाथा कानडे.
ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ११ दिनांक : १५-०३-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : आस्थापना कायम सुचीवरील कनिष्ठ अभियंता / सहाय्यक नगररचनाकार ही पदे खुल्या / अनुशेषांतर्गत सरळसेवेने भरती बाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : विनंती रिपोर्ट सादर की, आस्थापना कायम सुचीवरील कनिष्ठ अभियंता व सहाय्यक नगर रचनाकार ही पदे खुल्या / अनुशेषातंर्गत उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यांत होते. सदर उमेदवारांची दिनांक १४-२-२००८ रोजी लेखी परिक्षा घेण्यांत आली असता सदर लेखी परिक्षेमधुन पात्र झालेल्या उमेदवारांची दिनांक २२-२-२००८ रोजी मा. उपायुक्त (सा) यांचे अध्यक्षतेखाली मा. निवड समितीने तोंडी परिक्षा घेवुन त्यामधुन खालील उमेदवारांची निवड केलेली आहे.

| अ. नं | पदांचे नाव | पद संख्या | जातीचा प्रवर्ग | उमेदवारांचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक नगर रचनाकार | १ | अनुसुचित जाती | श्री. प्रभुणे श्रीकांत ठकण<br>**प्रतिक्षा यादी**<br>श्री. सातपुते अजय रंगनाथ |
| २ | सहाय्यक नगर रचनाकार | २ | खुला | १.श्री. कर्पे प्रणव बबनराव<br>२.श्री.मीर असिफ़ सुलतान सरदार<br>**प्रतिक्षा यादी**<br>श्री. जोशी वैभव मोहिनीराज |
| ३ | कनिष्ठ अभियंता | १ | भज ब | श्री. नामदे निशांत लक्ष्मणराव<br>**प्रतिक्षा यादी**<br>पंडोरे विनायक भाऊसाहेब |
| ४ | कनिष्ठ अभियंता | १ | खुला (महिला) | श्रीमती. बेलकर शर्मिली बापु<br>**प्रतिक्षा यादी**<br>निरंक |
| ५ | कनिष्ठ अभियंता | ३ | खुला | १. श्री. निबांळकर श्रीकांत रामचंद्र<br>२. श्री. पारखे मनोज सुभाष<br>३. श्री. गाडळकर गणेश काशिनाथ<br>**प्रतिक्षा यादी**<br>श्री. ठाणगे राजु लक्ष्मण |

अनुशेष व खुल्या सरळसेवा भरती अंतर्गत मा. निवड समितीने निवड केलेले उमेदवार १. श्री. प्रभुणे श्रीकांत ठकण २. श्री. कर्पे प्रणव बबनराव ३. श्री. मीर असिम सुलतान सरदार यांची सहाय्यक नगर रचनाकार या पदी वेतनश्रेणी रुपये ६५००-१०५०० यामध्ये व १. श्री. नामदे निशांत लक्ष्मणराव २. श्रीमती. बेलकर शर्मिली बापु ३. श्री. निबांळकर श्रीकांत रामचंद्र ४. श्री. पारखे मनोज सुभाष ५. श्री. गाडळकर गणेश काशिनाथ यांची कनिष्ठ अभियंता या पदी वेतनश्रेणी ६५००-१०५०० यामध्ये व अधिक महानगरपालिका नियमाप्रमणे महागाई भत्ता व इतर भत्ते यावर नेमणुक आदेश देणेस व त्याच प्रमाणे निवड झालेले उमेदवार नेमणुक आदेशानंतर १५ दिवसांच्या आंत हजर न झाल्यास प्रतिक्षा यादीवरील उमेदवाराची नेमणुक करणेस मंजुरीसाठीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर अंतर्गत लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्याप्रमाणे मा.महासभेपुढे मंजुरीस्तव ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, पुर्ण नस्ती सादर करणे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित प्रकरण मुळ नस्तीसह मंजुरीकरीता फेर सादर.

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, सदर प्रकरण सर्व नस्तीसह मा.महासभेसमोर ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट अंतर्गत लेखा परिक्षक , मुख्य लेखाधिकारी , मा.उपायुक्त (सा) , मा.आयुक्त सो यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

-- * --

चर्चा :

१. मा.श्री.कृ.द.जाधव :- कनिष्ठ अभियंता व नगररचनाकार यांचे भरती बाबतचे प्रोसिजर सुरुवातीपासुनच संशयास्पद आहे. या भरती बाबतच्या एकाच विषयाच्या जाहीराती तीन आलेल्या आहेत. यामध्ये उमेदवाराला कामाचा अनुभव ५ वर्षाचा आवश्यक दिलेला आहे. ज्यांना लेखि परिक्षेत जास्त मार्क मिळालेले आहेत त्यांना डावलण्यांत आलेले आहे. यामध्ये अभ्यासक्रम वेगवेगळा असतांना परिक्षा एकच घेण्यात आली तोंडी मुलाखत एकच घेण्यांत आली दिनांक १५/०२/२००८ ची परिक्षा दिनांक २२/०२/२००८ रोजी घेण्यांत आली. परिक्षेनंतर उशिरा निकाल रात्री लावण्यांत आला तद्नंतर शनिवार रविवार दोन दिवस कार्यालयास सुट्टी होती. त्यामुळे संबंधित उमेदवारांना ४८ तासांत नियमात बसले नाही म्हणुन तक्रार करता आलेली नाही. एकच उमेदवार दोन्ही परिक्षेस होते.

ज्यांना लेखी परिक्षेत जास्त मार्क मिळालेले आहेत त्या उमेदवारांना डावलण्यांत आले आहे. त्यांच्या तक्रारींचा विचार केलेला नाही. त्यामुळे सदर मुलाखती मध्ये झालेल्या उमेदवारांची निवड ही संशयास्पद आणि बेकायदेशिर आहे. यामध्ये कोर्टामध्ये रिट दाखल करण्यांत आलेली आहे. परंतु त्या तक्रारदारांना कोर्टाकडुन स्टे मिळालेला नाही. अशा परिस्थितीत अशा भरती बाबत परवानगी देवु नये अशी विनंती आहे.

२. मा.श्री.दिप चव्हाण :- या बाबत मा.सदस्य कृ.द.जाधव यांनी महत्वाची सूचना केलेली आहे. यावरुन त्याची पारदर्शकता कळेल दिनांक १४/०१/२००८ रोजी कनिष्ठ अभियंता व सहाय्यक नगररचनाकार यांच्या भरती बाबतची प्रोसेस काही तांत्रिक अडचणींमुळे पुढे ढकलण्यांत आली. दिनांक १४/०१/२००८ रोजीची प्रोसेस कोणत्या तांत्रिक कारणांमुळे थांबविण्यांत आली आहे. याचे तांत्रिक कारण काय आहे व तांत्रिक मुद्दा काय आहे. त्याची कारणे काय आहेत.

यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की, कनिष्ठ अभियंता व सहाय्यक नगररचनाकार यांच्या भरतीमध्ये काही त्रुटी आढळुन आल्याने पुढील तारीख कळविण्यांत येईल व उमेदवारांच्या गैरसोई बद्दल दिलगीर आहोत असे कळविण्यांत आले होते. या बाबतचे क्वालिफिकेशन बी.आर्च असे दिलेले होते त्यात सुधारणा करणे बाबत शासनाकडे विचारणा केली असता यामध्ये कनिष्ठ अभियंता करता डिप्लोमा होल्डर अलाउड केलेले नव्हते. असे समितीच्या निदर्शनांस आल्याने याबाबत मंत्रालयात विचारणा केली असता कनिष्ठ अभियंता यांचे बेसिक क्वालिफिकेशन बाबत समितीने निर्णय घेतला. सहा.नगररचनाकार पदा बाबत संभ्रम निर्माण झाल्यामुळे पुन्हा माहिती दिली.

मा.श्री.दिप चव्हाण यांनी दिनांक ०४/०१/२००८ चे निवड समितीच्या सभेचे प्रोसिडींग केलेले आहे काय त्यामध्ये काय कारण दाखविले आहे. याचा खुलासा करावा.

यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की, याबाबतचे प्रोसिडींग तयार केले आहे. रिपोर्ट केला आहे व समिती मध्ये चर्चा केल्या नंतरच निर्णय घेतलेला आहे.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी विचारले की, निवड समिती सदस्यांच्या त्या प्रोसिडींगवर सह्या आहेत काय? सदरच्या प्रोसिडींगवर सह्या दिसुन येत नाहीत. याबाबत दिनांक ०४/०१/२००८ चा रिपोर्ट सहाय्यक आयुक्त श्री.देशमुख यांनी वाचुन दाखविला. त्यामुळे श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, अ.नं.१ सहाय्यक नगररचनाकार निवड झालेले श्री.प्रभुणे श्रीकांत ठकण हे दिनांक ११/०४/२००७ रोजी पदवीधर झालेले आहेत. याकरीता जाहीरातीमध्ये क्वालिफिकेशन मध्ये व शब्द टाकुन ५ वर्षाचा अनुभव पाहिजे असे नमुद केलेले आहे. त्यामुळे सदर उमेदवारास ५ वर्षाचा कामाचा अनुभव नसल्याने सदर उमेदवाराचा अर्ज प्रथमत: रिजेक्ट होतो.

दिनांक १३/०१/२००८ रोजी जाहीरात दिलेली होती त्यामध्ये भरती बाबत नविन अटी टाकलेल्या आहेत. या करीता अनुभव किमान ५ वर्षाचा असावा असे नमुद केलेले आहे.

पहिल्या जाहीरातीनुसार अनुसूचित जाती मधुन सहाय्यक नगररचनाकार करीता १. श्री.प्रभुणे श्रीकांत ठकण व श्री.कानडे हे दोन उमेदवार होते. याबाबतचे प्रोसिडींग नाही व दुस-या जाहिरातीत श्री.सातपुते बी-आर्च यांचा अर्ज आहे. त्यांना बी-आर्च पदविका लागु नाही हा अर्ज त्यांना लागु होत नाही. पहिल्या जाहिरातीनुसार ज्यांनी अर्ज केलेले असतील त्यांनी पुन्हा अर्ज करण्याची गरज नाही असे सांगितले होते त्या बाबतचा रिपोर्ट कोठे आहे. नविन जाहिरातीच्या तारखेमध्ये वयोमर्यादा बदलण्याचा अधिकार कोणास दिलेला आहे.

लेखी परिक्षेमध्ये श्री.प्रभुणे श्रीकांत ठकण यांना ७५ पैकी ३९ मार्कस पडलेले आहेत व ते लेखी परिक्षेत पास झालेले आहेत मात्र दुसरे उमेदवार श्री.सातपुते यांना ४०.५० मार्कस् पडलेले असतांना ते नापास झालेले आहेत.

यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की, हे चुकीचे स्टेटमेंट आहे. उमेदवारांचे तोंडी परीक्षा २५ मार्कांची घेण्यांत आलेली आहे. तीन विद्यार्थी मेरीटमध्ये पास झालेले आहेत व याबाबतचा निर्णय समितीने घेतला आहे. ७५ मार्कांची लेखी परिक्षेसाठी गुण ठेवले होते व तोंडी परीक्षेसाठी २५ गुण ठेवण्यांत आले होते. नियमानुसार एम्प्लॉयमेंट कडुनही यादी मागविलेली होती लेखी परीक्षेतील मार्कानुसार एका जागेकरीता पाच पात्र उमेदवारांच्या दिनांक २२/०२/२००८ रोजी उपायुक्त प्रशासन यांचे अध्यक्षते खालील निवड समितीने तोंडी परीक्षा घेवुन उमेदवारांची निवड केलेली आहे. लेखी आणि तोंडी अशा दोन्ही परीक्षेतील जास्तीत जास्त मार्कस् मिळालेल्या नुसार तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पध्दती प्रमाणेच परीक्षा घेतलेली आहे.

यानंतर सहाय्यक आयुक्त श्री.आर.ए.देशमुख, स्थायी समिती ठराव क्रं.९ दिनांक १९/११/२००४ अन्वये पाणीपुरवठा ,नगररचना व बांधकाम विभागाकरीता आस्थापनेवर १२ पदे मंजुरीचा प्रस्ताव वाचुन दाखविला. व त्यामध्ये शासनाकडुन महानगरपालिकेकडे कनिष्ठ अभियंता पदांची संख्या अपुरी असल्यामुळे महानगरपालिका आस्थापना सुचीवर बांधकाम विभागाकरीता १२ पदे निर्माण करणे करीता प्रस्ताव देण्यांत आलेला आहे. मात्र यावर

मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, सदर बाबतीत मा.महासभेचा ठराव नाही. त्याबाबत काही क्युरी निघाली नाही काय ?

यापुर्वी श्री.इथापे यांची नियुक्तीचे वेळी आस्थापनेवर कनिष्ठ अभियंताचे पद उपलब्ध नसल्यामुळे नियुक्ती न करता ड्राप्समन या पदावर नियुक्ती करण्यांत येत आहे. असे लिहीलेले आहे.

श्री.अनाप, कनिष्ठ अभियंता यांची कोल्हापूर महानगरपालिका यांची अहमदनगर महानगरपालिका येथे कनिष्ठ अभियंता नेमणुक करण्यासाठी मा.महानगरपालिकेच्या सभेपुढे प्रस्ताव का आणण्यांत आला नाही. या बाबत विचारणा केली असता यावर सहा. आयुक्त यांनी खुलासा केला की, याबाबतचा ठराव झालेला आहे. व महाराष्ट्र शासनानेही यास मंजूरी दिलेली आहे.

पद भरती करतांना मे.कोर्टातुन लगेच कॅवेट दाखल करण्यांत आले यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की, काही तक्रारी असल्यामुळे भरती बाबत काही व्यत्यय येवु नये म्हणुन याबाबत कॅवेट दाखल करण्यांत आलेले होते.

मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, या बाबतची संपुर्ण भरती प्रक्रीया चुकीची आहे. भरती बाबत एका रात्रीतुन निवड समितीची यादी नोटीस बोर्डावर लावण्यात आली व ती यादी वाचतांना यादी गुणानुक्रमानुसार व आसनक्रमांकानुसार वाचावी असे नमुद करण्यांत आले.

यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की, याबाबत दुरुस्ती करुन यादी बोर्डावर लावलेली होती.

मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, निवडी बाबतची प्रत्येक प्रक्रीया चुकत गेली आहे. यामध्ये उमेदवारांचे क्वालीफिकेशन, मनपा जाहीर नोटीस इ. यामुळे लोकांवर अन्याय झाला असल्याने मी महासभेला विनंती करतो की, सदरची प्रोसिजर पुर्ण पणे रद्द करावी व या निवडीस माझा पुर्णपणे विरोध आहे.

मा.श्री.भानुदास कोतकर :- महानगरपालिके मध्ये अवघे चार अभियंते आहेत शहरात विकास कामे करतांना व त्याचे एस्टीमेट तयार करतांना या अभियंत्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. नविन अभियंत्यांची भरती केल्यामुळे शहर विकासाला चालना मिळेल. ही भरती कायदेशिर की बेकायदेशिर या बाबत खोलात न शिरता शहर विकास कामास चालना मिळेल हा हेतु डोळयासमोर ठेवुन विरोधकांनी या

भरती प्रक्रीयेला विरोध न करता सर्वानुमते मंजुरी द्यावी असे सुचविले. जाहीरात देवुन सुध्दा महानगरपालिकेला लोक भेटत नाहीत. टेंम्पररी इंजिनियर काम करीत नाहीत. सध्या इंजिनियर लोकांना बाहेरच्या क्षेत्रामध्ये ३५ ते ४० हजार रुपये पगार मिळतो त्यामुळे इंजिनियर महानगरपालिकेकडे हजर होत नाहीत. त्यामुळे या विषयास मंजुरी द्यावी असे सुचविले.

त्यानंतर सभागृहात एकदम मोठा गोंधळ होवुन सर्वश्री विनित पाउलबुध्दे , अशोक कानडे, अभय आगरकर , बहिरनाथ वाकळे, कृ.द.जाधव हे सर्व सन्माननीय सदस्य एकीकडे एकदम उभे राहुन विषय मंजुर करण्यास आमचा विरोध आहे असे सुचवित असतांनाच दुसरीकडे मा.महापौर यांनी " सदर विषय मंजुर करण्यांत येत असुन आजच्या सभेचे कामकाज संपविण्यात येत आहे." असे म्हटले व त्यानंतर राष्ट्रगीतास सुरूवात झाली.

-- * --

**ठराव** : ऑफीस रिपोर्ट व सभागृहामध्ये मा.सदस्य व प्रशासन यांचेमध्ये झालेली साधक बाधक चर्चेचा विचार करता तसेच प्रशासनाने मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव व प्रत्यक्ष चर्चेच्या वेळी प्रशासनाने दिलेला खुलासा व मत याचा देखील विचार ही सभा करीत असून प्रशासनाने सादर केलेल्या कार्यालयीन प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. सदर बाबत नियमानुसार कार्यवाही करावी

तथापी सदरच्या ठरावास १.मा.श्री.दिप चव्हाण २. मा.श्री.विनित पाउलबुधे ३.मा. श्री.अशोक कानडे ४. मा.श्री.अभय आगरकर ५. मा. श्री.बहिरनाथ वाकळे ६ .मा.श्री.कृ.द. जाधव , सदस्य,अहमदनगर महानगरपालिका यांचा विरोध नोंदविण्यात येत आहे.

ठराव बहुमताने मंजूर.

सुचक : मा.श्री.शेख मुद्यस्सर अहमद इसहाक

अनुमोदक : मा.श्री.किशोर डागवाले

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# मा.सर्वसाधारण सभा दिनांक १५-०३-२००८ रोजीची चर्चा

--*--

विषय क्रमांक :- प्रथमतः दुखवटयाचे प्रस्ताव घेणेत आले.

मा.श्री.कावरे - कर्मचारी कामावर असतांना मृत्यु झाल्यास त्याबाबत तरतूद काय आहे ? कर्मचा-यांस किमान ५ लाख रु. मिळाले पाहिजेत त्यासाठी काय केले पाहिजे. पुलगम यांचेसाठी अनुकंपा तत्वानुसार त्यांच्या फॅमिलीमध्ये एकाला नौकरी दिली पाहिजे.

मा.उपायुक्त - दैनंदिन कामगार शिडीवरुन पडुन मृत्यु ? तो न्यायालयीन कर्मचारी असल्याने वारस लावता येणार नाही. नविन भरती मध्ये त्यांचे वारसासाठी प्रयत्न करु. नियमाप्रमाणे देय रक्कम देवू.

मा.श्री.जाधव - विठठलराव येमूल पद्मसाळी समाजाचे कारभारी होते. त्यांची अपरिमित हानी झाली आहे. पुलगम बिगारी असुन देखिल वायरमनचे काम त्यांना दिले कसे. कायद्यावर बोट ठेवू नका. कोणाचीही बाजू झटकून टाकू नका. पोलवर पाठवणे बाबतचे पुरावे दाखवावे.

मा.श्री.नज्जु पहेलवान - पालिकेचे अधिकारी मदत करणार का नाही. कर्मचा-यांनी कोणाच्या भरवशावर काम करायचे, ड्युटीवर असलेल्या कामावरील कर्मचारी यांचे बाबत कोणी जबाबदारी घ्यावयाची.

मा.श्री.गिरवले - पाणी पुरवठ्यात पाईप वापरल्याने पाणी प्रश्न सुटेल. संबंधित अधिकारी यांना आदेश देवुन गॅरेज व इतरत्र पडलेले पाईप आहेत त्यांचा योग्य वापर करुन त्यामुळे पाणी प्रश्न सुटेल.

मा.उपमहापौर - प्रत्यक्ष साईट बघा श्री. पालवे.

मा.श्री.कानडे - चार पाईप पडलेले आहेत. त्यांचा काही उपयोग नाही तेथील पाईप उचलून ते योग्य ठिकाणी वापरावेत.

मा.महापौर - त्या पाईपांची गरज नव्हती काय ? त्याबाबतची फाईल मागवा. त्याशिवाय सत्य कळणार नाही.

मा.श्री.घुले - दोन तास जी चर्चा झाली, महापौरांचे निवेदन दलित वस्तीबाबतच्या इतिहासाची परंपरा, महानगरपालिका कोर्ट कचे-या, २००३ मध्ये महानगरपालिकेत रुपांतर सुरुवातीस भगवानराव फुलसौंदर, महापौर व नंतर संदीप कोतकर, महापौर, विकासासाठी अभिनंदन, दोन रस्त्यांची कामे पुर्ण झाली ठेकेदाराचे काम पुर्ण निविदापुर्वी ठेकेदारांनी जी जनतेच्या दृष्टीने कामे केली आहेत ती अयोग्य आहेत. ठेकेदारांची दादागिरी चालणार नाही.
मा.श्री.जोशी - टेंडर कुणी पळवले याबाबत मागील सभेत उत्तर देणार होता त्याचे काय झाले ते समजले नाही.

मा.श्री.घुले - याबाबत दैनिक सकाळमध्येच वाचल्यानंतर समजले आहे.

मा.उपायुक्त - प्रशासनातर्फे खुलासा करण्यांत आला की, अभियंता पाठवुन टेंडर प्रक्रीया स्थगित केली आहे.

मा.श्री.घुले - गोंधळाने ऐकु आले नाही.

मा.उपमहापौर - काम केलेले आहे ते तसेच ठेवण्यांत यावे. त्यांचा सत्कार करण्यांत यावा. बिल अदा करण्यांत येवु नये. देणगी दिली आहे असे समजावे.

मा.श्री.आगरकर - सदर काम करुन घेणे विशेष नाही परंतु याबाबत कामास गृहीत मंजुरी घेवुन कामे केली आहे किंवा कसे प्रशासनातर्फे खुलासा केलेला नाही. याबाबत चौकशी करावी पुर्ण छडा लावावा व त्याबाबतचे बिल काढण्यांत येवु नये.

मा.श्री.गिरवले - या कामाचे उद्‌घाटन मा.महापौर यांनी केले होते काय.

मा.श्री.जाधव - मंजूरी गृहीत धरुन कामे यापुर्वी केलेली आहेत. त्यावर कारवाई करणे असा भाग होत नाही. त्यामुळे यामध्ये महानगरपालिका अधिकारी कमजोर वगैरे नाहीत तसेच निराशही नाहीत तसेच याकामी काही भ्रष्टाचार झाला असेही नाही. परंतु या जनतेच्या कामाबाबत प्रशासनानेच खुलासा करणे व उत्तर देणे आवश्यक होते.

मा.श्री.घुले - या कामाबाबत काय गौडबंगाल आहे, व कोण ठेकेदार आहे. याबाबत ठेकेदारास काय शिक्षा दिली आहे. किंवा काळया यादीत टाकले आहे काय याबाबत खुलासा करावा.

मा.श्री.भानुदास कोतकर - याबाबत विशेष चर्चा झालेली आहे. जनतेच्या हिताच्या दृष्टीकोनातुन मा.महापौर यांनीच सदरचे काम चालु करण्यांस सांगितले होते. तथापि हा चर्चेचा विषय होवु शकत नाही.

मा.श्री.आगरकर - कोणतेही काम सांगणे हा विषय येथे नाही. परंतु कामास गृहीत मंजुरी दिलेली आहे असा खुलासा प्रशासनाकडुन आलेला नाही. याबाबत आयुक्त यांचेकडुन मंजुरी घेतली असती तर समजु शकले असतो. याबाबत प्रोसिजर गुंडाळुन टाकावयाची आहे काय.

मा.श्री.जाधव - मंजुरी गृहीत धरुनच कामे केलेली आहेत. या बाबत ठेकेदारांचा काहीच गुन्हा नाही. तथापि याबाबत कमजोर अधिकारी आणि निराश कर्मचारी अशी महानगरपालिकेची अवस्था आहे.

श्री. शेख मुदस्सर अहमद इसहाक,नगरसेवक यांनी सभेपुढे पत्र देवून वाढीव हद्दीतील कर्मचारी श्री. सय्यद मोहम्मद अली शकील यांची नेमणुक तालीम मास्तर म्हणून तत्कालीन ग्रामपंचायत कालावधीत वर्ग ३ मध्ये नेमणुक करण्यात आली होती. परंतु मा.शासनाकडे माहिती बाबत पत्र व्यवहार करताना वर्ग ४ मध्ये पद दर्शविण्यात आले आहे. अशा बाबत श्री.शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी पत्राद्वारे कळविले आहे. तरी त्यांचे यादी बाबत नियमानुसार व कायदेशीरदृष्टया प्रकरण छाननी करून नंतरच पुढील उचित कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- १ -

मा.श्री.दिप चव्हाण - मागील विषय क्रमांक ४ अत्योंदय योजना लाभार्थींची मंजुरी देणे बाबत फेर सर्व्हे करणे बाबत. कुठपर्यंत कार्यवाही आली याचा खुलासा करावा.

यावर श्री.वैद्य नेरोयो प्रमुख यांनी खुलासा केला.

मा.श्री.अशोक कानडे - लाभार्थींची यादी करतांना २९६ लाभार्थींची निवड करण्यांत आली मात्र १०७ यांच्या ऐवजी नव्याने लाभार्थी यांची निवड करुन यादी सोबत सादर केली होती. याबाबत फेरसर्व्हे करुन यादी करण्यांत यावी व फेरसर्व्हे करण्यांस मान्यता दिली होती तथापि जिल्हा कार्यालयाकडुन यादी प्राप्त झालेली नाही.

मा.श्री.दिप चव्हाण - याबाबतचा प्रश्न जिल्हा कार्यालयाशी निगडीत असल्याने महानगरपालिका ठरावाव्दारे रुलिंग काही दिले तरी ते त्यांना लागु होत नाही. शासन निर्णया प्रमाणे मंजुरी देण्यांत यावी.

उपायुक्त यांनी खुलासा केला की, मा.सदस्य यांच्या सुचनेप्रमाणे फेरसर्व्हे करणे बाबत सुचविले आहे. व त्याप्रमाणे मंजुरी द्यावी लागणार आहे असे सांगितले.

उपमहापौर यांनी सुचविले की, सध्याचे यादीस मंजुरी द्यावी व फेरसर्व्हे करणे करीता विनंती करावी.

त्यावर महापौर यांनी अशी विनंती करुन असे सांगितले.

मा.श्री.दिप चव्हाण - मागील मिटींग मधील प्रस्ताव क्रमांक ६ चे काय झाले.

मा.महापौर - यांनी खुलासा केला.

मा.श्री.दिप चव्हाण- अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी यांची पोस्ट रिक्त आहे. ती भरण्या बाबत काय कार्यवाही केली व करण्यांत येत आहे. त्याची माहिती द्यावी. तसेच सदरची पोस्ट भरेपर्यंत सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा. फेरसादर झाल्यानंतर हा विषय कन्फरमेशनला घेण्यांत यावा.

प्रभारी आयुक्त - वैद्यकीय अधिकारी यांचे पद रिक्त आहे. सदरचे पद भरलेले नाही शासनाकडे पाठपुरावा केलेला आहे. आरोग्य अधिकारी (डॉ.कुलकर्णी ) यांचे पद न्यायप्रविष्ठ असल्याने व त्याचा निकाल लागलेला नसल्याने त्याबाबत कार्यवाही करु शकत नाही.

मा.श्री.आगरकर - जन्म मृत्यु विभागाची माहिती डॉ.कुलकर्णी यांना असल्यामुळे त्यांच्याकडे सदरचा विभाग सोपवावा असे सुचविले.

मा.आयुक्त साहेब मार्च एण्ड पर्यंत रजेवर आहेत महानगरपालिकेचे बजेट मंजुर झालेले असतांना व आर्थिक वर्ष संपण्यास १५ दिवस उरलेले असतांना चालु आर्थिक वर्षांचे टारगेट पुर्ण होणार आहे काय. या बाबत आयुक्त यांची जबाबदारी नाही काय ? त्यांनी रजा वाढविली आहे काय ?

मा.श्री. जाधव - कनिष्ठ अधिकारी यांना चार्ज द्यावयास पाहिजे. त्याबाबत ठराव करावा व तसे शासनास कळवावे.

प्रभारी आयुक्त - आयुक्त यांनी किती दिवस रजा घ्यावी हे सांगु शकत नाही. दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी माझेकडेस चार्ज दिलेला आहे. व आजच्या बैठकीपुरते मला प्राधिकृत केलेले आहे.

मा. महापौर - आयुक्त यांच्या रजेबाबत खुलासा केला.

मा.श्री.अनंत जोशी - मागील सभेच्या विषय क्रमांक ७ बाबत उपविधी बाबत विषय उपस्थित केला असता मा.महापौर यांनी सांगितले की, सदर बाबत १० एप्रिल २००८ पर्यंत मुदत देण्यांत येत आहे.

मा.श्री.जोशी - महानगरपालिकेमध्ये कुठले कर्मचारी कोठे काम करतात याबाबत गार्डन विभागाने खुलासा करावा.

यावर श्री.गोयल यांनी खुलासा केला.

यावर उपायुक्त यांनी सांगितले की, महानगरपालिकेमध्ये बिगारी या दर्जाचे बरेच कर्मचारी आहेत. त्याबाबत ३१ मार्च २००८ पर्यंत आढावा घेतला जाईल असा खुलासा केला व ज्याठिकाणी आवश्यकता असेल तेवढेच कर्मचारी नेमण्यांत येतील.

मा.श्री.गिरवले - सर्व विभागांना व्हीजीट देण्यांत यावी.

विषय क्रमांक : ३ :-

मा.श्री.दिप चव्हाण - याबाबतचे दर आणि कर वाढविता येतात किंवा कसे महानगरपालिकेला २० फेब्रुवारी पर्यंत अंदाजपत्रक मंजूर करुन घ्यावे लागते.

मा.श्री.आगरकर - नविपेठ दवाखाना येथे ब-याच कामाचा वर्कलोढ आहे तेंव्हा अशा ठिकाणी ॲडमिनीस्टेटीव्ह ऑफिसर महानगरपालिकेने पाठविणे बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उपायुक्त - याबाबत सेवा शुल्क महानगरपालिकेला घेता येईल असे सांगितले.

मा.श्री.आगरकर - महानगरपालिकेने नागरिकांना रुग्णसेवा दिली पाहिजे.

उपमहापौर - मान्य करण्यांत यावे अशी सुचना दिली.

श्री.पवळे वसुली अधिक्षक - सेवा शुल्क घेवु शकतो असा खुलासा केला.

मा.श्री.दिप चव्हाण - सदरचा प्रस्ताव सात महिन्या नंतर आलेला आहे.

विषय क्रमांक : ४ :- कै.उ.रा.बोगावत यांचे नांव देणे बाबत..

मा.श्री.चोपडा - सदर विषय मंजुर करा.

मा.श्री.गिरवले - माझे त्यास अनुमोदन आहे.

विषय क्रमांक : ५ :-

मा.श्री.अनंत जोशी - नगररचना विभागाकडुन सदरचा प्रस्ताव आलेला आहे. याबाबत अभिकर्ता नेमुन कार्यवाही करावी असे सुचविले.

मा.श्री.पवार - अभिकर्ता नको महानगरपालिकेने कार्यवाही करावी.

मा.श्री.कानडे - अभिकर्ता नेमल्यास अभिकर्त्याची दादागिरी होईल त्याकरीता शासकीय नॉर्म्स काय आहेत. नियमाप्रमाणे महिला मागासवर्गिय इत्यादी करीता कशा प्रकारे देणार आहात. शासकीय कोट्याप्रमाणे राखीव ठेवण्यांत यावे.

मा.श्री.जाधव - अभिकर्ता नेमु नये या बाबत महानगरपालिकेने जकात अभिकर्ता नेमलेला आहे तसेच मनपा सिध्दीबाग उद्यानामध्ये फुलराणी चालविण्याकरीता अभिकर्ता नेमलेला आहे. त्याचा अनुभव महानगरपालिकेला असल्यामुळे त्याची काय अवस्था झाली आहे हे पाहुन त्याकरीता अभिकर्ता नेमु नये. वसुली विभागाकडे मार्केटची काय परिस्थिती आहे. त्यांचे रेकॉर्ड व्यवस्थीत नाही. पैसे वसुल का होत नाहीत हे समजु शकत नाही. वरील परिस्थिती पाहता अभिकर्ता आजिबात नेमु नये.

मा.श्री.गिरवले - सदरचे गाळे जागा भाडयाने देतांना इतर टॅक्स लावणे बाबत काय प्रयोजन आहे. सदर जागा मालक म्हणुन महानगरपालिका स्वतःच असतांना घरपट्टी आकारणी करण्याचे कारण नाही.

मा.श्री.आगरकर - सदर इमारतीचे काम ए.श.वि.यो. मधुन झाले असल्यामुळे या योजनेतुन झालेला खर्च वसुल झाला पाहिजे.

श्री.धोंगडे नगररचनाकार - सदर बाबीमध्ये मनपाचे घरपट्टी व इतर टॅक्सेस महानगरपालिकेला घ्यावे लागतील असे सुचविले.

सभागृहात गोंधळ

मा.महापौर - सदर बाबतीत भाडयामध्येच घरपट्टी ॲड करुन दिली तर शिवाय लिलाव पध्दतीने आपण गाळे द्यावे असे सांगितले.

मा.श्री.मिलींद गंधे - अभिकर्ता नेमण्यांस विरोध आहे. रस्त्यावर जे भाजी विक्रेते सध्या बसतात त्यांची नोंद करुन घेवुन त्यांना प्राधान्याने गाळे देण्यांत यावे व रस्त्यावर कोणत्याही प्रकारची भाजी विकली जाणार नाही याची दक्षता यापुढे घेण्यांत यावी.

मा.महापौर - लवकरात लवकर लिलाव पध्दतीने गाळे देण्यांत येतील.

मा.उपमहापौर - बंद पाकिट निविदा मागविण्यांत येतील.

मा.श्री.आगरकर - बंद पेटी आयुक्त कार्यालयांत राहील.

मा.श्री.भानुदास कोतकर - महानगरपालिका टॅक्स भाडयामध्ये एकत्र करुन आकारणी करावी.

प्रभारी आयुक्त यांनी खुलासा केला की, सदर योजना केंद्र शासनाच्या योजनेतुन होत असल्याने यामध्ये घरपट्टी आकारण्याचा विषय हा स्वतंत्र विषय आहे.

मा.महापौर - ओट्यावरील टॅक्स माफ करुन इतर टॅक्स मात्र माफ होणार नाही.

मा.श्री.वाकळे - मालमत्ता कर यामध्ये लावण्यांस माझा विरोध नोंदविण्यांत यावा.

विषय क्रमांक : ६ :-

नगररचनाकार यांनी खुलासा केला की, महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर महानगरपालिका स्तरावर चर्चा होणे गरजेचे असल्याने महापालिका सभेपुढे मांडुन त्यावर अभिप्राय घेवुन परत पाठवावे अशा बाबत सुचविले असल्याने सदरचा प्रस्ताव मा.सभागृहापुढे लिगल रिटेनर यांचे मत घेवुन ठेवण्यासाठी सांगितले होते. त्यामुळे हा प्रस्ताव ठेवलेला आहे.
अनधिकृत बांधकामे नियमित करणेबाबत माहिती दिली.

मा.श्री.कानडे - याबाबतचे नियम व उपविधी मंजुर केले आहेत काय तोपर्यंत या विषयाला विरोध आहे.

यावर नगररचनाकार यांनी सांगितले की, एम.आर.टी.पी.ॲक्ट नुसारच कार्यवाही करण्यांत येत आहे.

मा.श्री.कानडे - तरी सुध्दा आमचा विरोध नोंदविणे बाबत सुचविले.

मा.श्री.कृ.द.जाधव - यामुळे महानगरपालिकेचा फायदा होणार आहे. अहमदनगर शहरातील दवाखाने हॉस्पीटल इत्यादींना यामधुन सवलत देता आली तर त्याचा आवश्य विचार करावा. या बाबत सर्व डॉक्टरांनी महानगरपालिकेला पत्र दिलेले आहे.

मा.श्री.उडाणशिवे - अनधिकृत झोपडया नियमीत करण्याबाबत काय तरतुद आहे काय. स्मरणपत्र देण्यांत यावे.

मा.महापौर - खुलासा की, घोषित करण्या बाबत कार्यवाही चालू असते.

मा.श्री.अनंत जोशी - गुंठेवारी प्रकरणास हा नियम लागू आहे काय ? सदर नियम गुंठेवारी प्रकरणास लागू नसल्याचा खुलासा नगररचनाकार यांनी केला.

मा.श्री.सुळ उपमहापौर - गुंठेवारीतील किरकोळ दुरुस्ती बाबत महासभेची मंजुरी घेवुन शासनाकडे पाठवा. व नियमाबाबत प्रस्ताव सादर करावा.

यावर प्रभारी आयुक्त यांनी - नियमामध्ये दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित आहे. या बाबत कंटीन्युअस कार्यवाही होणार आहे. गुंठेवारी स्वतंत्र प्रस्ताव तयार करुन सभेपुढे सादर करावा अशा सुचना दिल्या.

मा.श्री.अनंत जोशी - पुढील सभेपुढे असा प्रस्ताव ठेवावा.

मा.श्री.नामदेव पवार - कंम्प्लीशन सर्टिफिकेट कंम्पलसरी करावे व अनधिकृत असल्यास तीन पट घरपट्टी लावण्यात यावी. दंडात्मक कारवाई किती लोकांवर केली आहे त्याची माहिती द्यावी.

मा.श्री.कृ.द.जाधव - सदर विषय मंजूर करण्यांस हरकत नाही पुढील विषय घ्यावा.

मा.श्री.कैलास गिरवले - ज्या बांधकामांना नियमानुसार परवानगी दिली आहे त्यांनी परत तेथे बांधकामे जर चालू ठेवली आहेत ती नियमबाह्य बांधकामे नियमीत करणे चुकीचे ठरणार आहे. या करीता पुढील बांधकाम नियमीत करु नये. अनधिकृत बांधकामा बाबत शहराचे दोन विभाग (सेल) तयार करुन श्री.मगर व इथापे यांना वाटप करुन त्याप्रमाणे काम देण्यांत यावे. तसेच बॉम्बे नर्सिग होम ॲक्ट नुसार हॉस्पीटल मधील बांधकामांबाबत काय करता येईल ते पहावे.

यावर मा.महापौर - दंडात्मक कारवाई करता येईल का ते पहावे.

मा.श्री.कैलास गिरवले - पार्किंगमध्ये बांधकाम केलेले असेल तर ती पार्किंग जागा मोकळी केली पाहिजे ती मोकळी केल्या शिवाय परवानगी देवू नये.

मंगल कार्यालयांस हा नियम लागू होत नाही.

मा.श्री.वाकळे - एफ.एस.आय.व्यतिरिक्त काही बांधकामे असतील त्याबाबत काय करणार आहात. ज्या इमारतींवर टेलिफोन मोबाईल टॉवर उभारणी करण्यांत आली आहे त्यास दंडात्मक कारवाई कायद्यानुसार करुन घेता येईल काय ?

मा.महापौर - दंडात्मक कारवाई करण्यांत यावी.

मा.श्री.आगरकर - सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे नगररचना विभागाने आणल्या बद्दल त्यांना मी धन्यवाद देतो. अनियमित बांधकामे नियमित करतांना टी.डी.आर. कोणता व कसा घेणार आहात. भौगोलिक परिस्थितीचा विचार करणार आहात काय. कापड बाजार व इतर अशा ठिकाणांचे स्पेसिफिकेशन झालेले नाही ते होणे आवश्यक आहे. केडगांव आणि कापडबाजार यामध्ये फरक आहे. याबाबतही खुलासा करावा. या बाबत प्रस्तावात त्रुटी आहेत. चटई क्षेत्रामध्ये वाढ असल्यास नियमानुसार करता येणार नाही. तसेच प्रकरण सादर होत असतांना प्रकरण आल्याची आणि पुर्ण केल्याची तारीख इत्यादी नोंदी करणे आवश्यक आहे. याबाबत ठरावात नमुद करावे.

सर्व नगर शहराचे अनधिकृत बांधकामे अंदाजे किती आहेत याबाबत व्ही.डी.ओ.शुटींग करुन ठेवण्यांत यावे व त्यामुळे महानगरपालिकेला ॲक्शन घेता येईल.

विषय क्रमांक : ७ व ८ :-

मा.श्री.वाकळे - सदर कर्मचा-यांना त्यांचे वयाचा व नोकरीचा विचार करुन त्यांना पुनःश्च नोकरीवर घेण्यात यावे.

मा.श्री.कानडे - सदर कर्मचा-यांच्या वयाचा विचार करुन त्यांना माफ करुन कामावर घेण्यात यावे.

मा.श्री.आगरकर - सदर दोन्ही कर्मचा-यांना कामाची जरुरी दिसुन येत नाही. ते कशामुळे गैरहजर होते. याचे रेकॉर्ड काहीही आलेले नाही. त्यामुळे अशा कर्मचारी हे गैरहजेरी बाबत स्वतःच जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांना कामावर घेतल्यास कोणत्याही इतर कर्मचा-यांना धाक रहाणार नाही याचा काही विचार करणार आहात किंवा नाही. व कोणतेही कर्मचारी महानगरपालिके मध्ये काम करणार नाहीत. कामाची खोटी करुन कर्मचारी गैरहजर रहातात त्यामुळे नागरीक त्यांच्या सेवासुविधां पासुन मुकतात. वर्षानुर्षे कर्मचारी गैरहजर रहात असल्याने नागरिकांची हेळसांड होत असेल तर आपण त्यांना माफ करु शकणार नाही.

मा.श्री.उडाणशिवे - सदर कर्मचारी हे मागासवर्गातील आहेत त्यांना कामाची माहिती नाही. याबाबत सर्वतोपरी विचार करुन त्यांना कामावर घेण्यांत यावे

त्यामुळे सभागृहात गोंधळाचे वातावरण तयार होवुन सदस्य सर्वश्री.नामदेव पवार, आसाराम कावरे, अशोक कानडे इ. सदस्य एकदम उभे राहुन भाषण करु लागले व त्यांनी भाषण सुरु ठेवले.

मा.श्री.कृ.द.जाधव - सदर कर्मचा-यांवर सर्वतोपरी नियमानुसार कार्यवाही करुन आता त्यांनी दयेसाठीचा अर्ज आपणांकडे सादर केला आहे. त्यामुळे त्यांचा विचार करावा.

मा.श्री.दिप चव्हाण - कर्मचारी कोणत्या विभागात काम करीत होते. त्यांचा विभाग कोणता आहे. व त्यांना महानगरपालिकेच्या सर्व सेवा शर्ती लागु होतात काय ?

मा.श्री.गिरवले - सदर कर्मचा-यांना यापुर्वी संधी दिलेली होती. परंतु ते कामावर हजर झालेले नाहीत. व त्यांच्याकडे पाहिले असता ते शारीरीक काम करण्याच्या परिस्थितीत नाहीत त्यामुळे त्यांना कामावर घेण्यांत येवु नये.

मा.श्री.नामदेव पवार - सदर कर्मचा-यांना महानगरपालिका सभेपुढे अपिल करण्याचा अधिकार आहे. तर मग निर्णय घेण्याचा अधिकार सभागृहास नाही काय ?

प्रभारी आयुक्त - याबाबत महानगरपालिका सभेपुढे प्रस्ताव आलेला आहे याबाबत जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो घेवू शकता.

विषय क्रमांक : ९ :-

सदर विषय मंजूर करणे बाबत सर्व श्री.अभय आगरकर, संजय चोपडा, विनीत पाउलबुधे, कृ.द.जाधव यांनी सुचविले.

मा.श्री.गिरवले - विहित पध्दतीचा अवलंब करुन भरती करण्याबाबत विरोध नाही. मात्र विहित पध्दत म्हणजे कशी याचा नियम तुमच्या पध्दतीने होणार आहेत काय ? याबाबतचा खुलासा करावा.

यावर सहाय्यक आयुक्त यांनी याबाबतचा खुलासा सादर केला.

मा.श्री.गिरवले - श्री.इथापे यांचे बाबत सुध्दा महानगरपालिका सभेने ठराव केला असतांनाही त्यांना पदोन्नती का देण्यांत आली नाही.

मा.श्री.दिप चव्हाण - इतरही बरीच पदे रिक्त आहेत याबाबत काय कारवाई करण्यांत आली याची माहिती मिळावी. तसेच महानगरपालिके मध्ये नगरसचिव हेही अत्यंत महत्वाचे आहे ते पद रिक्त आहे काय ?

प्रभारी आयुक्त - महानगरपालिके मध्ये सध्या बरीच पदे रिक्त आहेत त्याबाबतचा आढावा घेतला आहे. याबाबत पदे भरतांना कर्मचा-यांची सेवाजेष्ठता व त्यांचे गोपनीय अहवाल इ. पुढील कार्यवाही करणार आहे. व जे कर्मचारी पात्र आहेत त्यांचा पदोन्नती करीता विचार करण्यांत येणार आहे.

विषय क्रमांक : १० :-

महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारती बाबत शहर अभियंता यांनी खुलासा केला व सध्या जे ठेकेदार काम करीत आहेत त्यांचेकडुनच त्याच रेटमध्ये पुढील काम करुन घेतले गेल्यास पुढील रेटमध्ये वाढ होणार नाही व महानगरपालिकेचा त्यामध्ये फायदा होईल.

मा.श्री.नामदेव पवार - मंजूर. मागील वर्षीच्या डी.एस.आर प्रमाणेच काम होणार असल्याने सदरचे प्रकरण मंजूर होण्यास हरकत नाही.

मा.श्री.गिरवले - सदर बाबत नविन एस्टीमेट मध्ये ॲटम वाईज कोणते रेट आहेत याचा उल्लेख करावा.

विषय क्रमांक : ११ :-

१. मा.श्री.कृ.द.जाधव :- कनिष्ठ अभियंता व नगररचनाकार यांचे भरती बाबतचे प्रोसिजर सुरुवातीपासुनच संशयास्पद आहे. या भरती बाबतच्या एकाच विषयाच्या जाहीराती तीन आलेल्या आहेत. यामध्ये उमेदवाराला कामाचा अनुभव ५ वर्षाचा आवश्यक दिलेला आहे. ज्यांना लेखि परिक्षेत जास्त मार्क मिळालेले आहेत त्यांना डावलण्यांत आलेले आहे. यामध्ये अभ्यासक्रम वेगवेगळा असतांना परिक्षा एकच घेण्यात आली तोंडी मुलाखत एकच घेण्यांत आली दिनांक १५/०२/२००८ ची परिक्षा दिनांक २२/०२/२००८ रोजी घेण्यांत आली. परिक्षेनंतर उशिरा निकाल रात्री लावण्यांत आला तद्नंतर शनिवार रविवार दोन दिवस कार्यालयास सुट्टी होती. त्यामुळे संबंधित उमेदवारांना ४८ तासांत नियमात बसले नाही म्हणुन तक्रार करता आलेली नाही. एकच उमेदवार दोन्ही परिक्षेस होते.

ज्यांना लेखी परिक्षेत जास्त मार्क मिळालेले आहेत त्या उमेदवारांना डावलण्यांत आले आहे. त्यांच्या तक्रारींचा विचार केलेला नाही. त्यामुळे सदर मुलाखती मध्ये झालेल्या उमेदवारांची निवड ही संशयास्पद आणि बेकायदेशिर आहे. यामध्ये कोर्टामध्ये रिट दाखल करण्यांत आलेली आहे. परंतु त्या तक्रारदारांना कोर्टाकडुन स्टे मिळालेला नाही. अशा परिस्थितीत अशा भरती बाबत परवानगी देवु नये अशी विनंती आहे.

२. मा.श्री.दिप चव्हाण :- या बाबत मा.सदस्य कृ.द.जाधव यांनी महत्वाची सूचना केलेली आहे. यावरुन त्याची पारदर्शकता कळेल दिनांक १४/०१/२००८ रोजी कनिष्ठ अभियंता व सहाय्यक नगररचनाकार यांच्या भरती बाबतची प्रोसेस काही तांत्रिक अडचणींमुळे पुढे ढकलण्यांत आली. दिनांक १४/०१/२००८ रोजीची प्रोसेस कोणत्या तांत्रिक कारणांमुळे थांबविण्यांत आली आहे. याचे तांत्रिक कारण काय आहे व तांत्रिक मुद्दा काय आहे. त्याची कारणे काय आहेत.

यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की, कनिष्ठ अभियंता व सहाय्यक नगररचनाकार यांच्या भरतीमध्ये काही त्रुटी आढळुन आल्याने पुढील तारीख कळविण्यांत येईल व उमेदवारांच्या गैरसोई बद्दल दिलगीर आहोत असे कळविण्यांत आले होते. या बाबतचे क्वालिफिकेशन बी.आर्च असे दिलेले होते त्यात सुधारणा करणे बाबत शासनाकडे विचारणा केली असता यामध्ये कनिष्ठ अभियंता करता डिप्लोमा होल्डर अलाउड केलेले नव्हते. असे समितीच्या निदर्शनांस आल्याने याबाबत मंत्रालयात विचारणा केली असता कनिष्ठ अभियंता यांचे बेसिक क्वालिफिकेशन बाबत समितीने निर्णय घेतला. सहा.नगररचनाकार पदा बाबत संभ्रम निर्माण झाल्यामुळे पुन्हा माहिती दिली.

मा.श्री.दिप चव्हाण यांनी दिनांक ०४/०१/२००८ चे निवड समितीच्या सभेचे प्रोसिडींग केलेले आहे काय त्यामध्ये काय कारण दाखविले आहे. याचा खुलासा करावा.

यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की, याबाबतचे प्रोसिडींग तयार केले आहे. रिपोर्ट केला आहे व समिती मध्ये चर्चा केल्या नंतरच निर्णय घेतलेला आहे.

यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी विचारले की, निवड समिती सदस्यांच्या त्या प्रोसिडींगवर सह्या आहेत काय? सदरच्या प्रोसिडींगवर सह्या दिसुन येत नाहीत. याबाबत दिनांक ०४/०१/२००८ चा रिपोर्ट सहाय्यक आयुक्त श्री.देशमुख यांनी वाचुन दाखविला. त्यामुळे श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, अ.नं.१ सहाय्यक नगररचनाकार निवड झालेले श्री.प्रभुणे श्रीकांत ठकण हे दिनांक ११/०४/२००७ रोजी पदवीधर झालेले आहेत. याकरीता जाहीरातीमध्ये क्वालिफिकेशन मध्ये व शब्द टाकुन ५ वर्षाचा अनुभव पाहिजे असे नमुद केलेले आहे. त्यामुळे सदर उमेदवारास ५ वर्षाचा कामाचा अनुभव नसल्याने सदर उमेदवाराचा अर्ज प्रथमतः रिजेक्ट होतो.

दिनांक १३/०१/२००८ रोजी जाहीरात दिलेली होती त्यामध्ये भरती बाबत नविन अटी टाकलेल्या आहेत. या करीता अनुभव किमान ५ वर्षाचा असावा असे नमुद केलेले आहे.

पहिल्या जाहीरातीनुसार अनुसूचित जाती मधुन सहाय्यक नगररचनाकार करीता १. श्री.प्रभुणे श्रीकांत ठकण व श्री.कानडे हे दोन उमेदवार होते. याबाबतचे प्रोसिडींग नाही व दुस-या जाहिरातीत श्री.सातपुते बी-आर्च यांचा अर्ज आहे. त्यांना बी-आर्च पदविका लागु नाही हा अर्ज त्यांना लागु होत नाही. पहिल्या जाहिरातीनुसार ज्यांनी अर्ज केलेले असतील त्यांनी पुन्हा अर्ज करण्याची गरज नाही असे सांगितले होते त्या बाबतचा रिपोर्ट कोठे आहे. नविन जाहिरातीच्या तारखेमध्ये वयोमर्यादा बदलण्याचा अधिकार कोणास दिलेला आहे.

लेखी परिक्षेमध्ये श्री.प्रभुणे श्रीकांत ठकण यांना ७५ पैकी ३९ मार्कस पडलेले आहेत व ते लेखी परिक्षेत पास झालेले आहेत मात्र दुसरे उमेदवार श्री.सातपुते यांना ४०.५० मार्कस् पडलेले असतांना ते नापास झालेले आहेत.

यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की, हे चुकीचे स्टेटमेंट आहे. उमेदवारांचे तोंडी परीक्षा २५ मार्कांची घेण्यांत आलेली आहे. तीन विद्यार्थी मेरीटमध्ये पास झालेले आहेत व याबाबतचा निर्णय समितीने घेतला आहे. ७५ मार्कांची लेखी परिक्षेसाठी गुण ठेवले होते व तोंडी परीक्षेसाठी २५ गुण ठेवण्यांत आले होते. नियमानुसार एम्प्लॉयमेंट कडुनही यादी मागविलेली होती लेखी परीक्षेतील मार्कानुसार एका जागेकरीता पाच पात्र उमेदवारांच्या दिनांक २२/०२/२००८ रोजी उपायुक्त प्रशासन यांचे अध्यक्षते खालील निवड समितीने तोंडी परीक्षा घेवुन उमेदवारांची निवड केलेली आहे. लेखी आणि तोंडी अशा दोन्ही परीक्षेतील जास्तीत जास्त मार्कस् मिळालेल्या नुसार तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पध्दती प्रमाणेच परीक्षा घेतलेली आहे.

यानंतर सहाय्यक आयुक्त श्री.आर.ए.देशमुख, स्थायी समिती ठराव क्रं.९ दिनांक १९/११/२००४ अन्वये पाणीपुरवठा ,नगररचना व बांधकाम विभागाकरीता आस्थापनेवर १२ पदे मंजुरीचा प्रस्ताव वाचुन दाखविला. व त्यामध्ये शासनाकडुन महानगरपालिकेकडे कनिष्ठ अभियंता पदांची संख्या अपुरी असल्यामुळे महानगरपालिका आस्थापना सुचीवर बांधकाम विभागाकरीता १२ पदे निर्माण करणे करीता प्रस्ताव देण्यांत आलेला आहे. मात्र यावर

मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, सदर बाबतीत मा.महासभेचा ठराव नाही. त्याबाबत काही क्युरी निघाली नाही काय ?

यापुर्वी श्री.इथापे यांची नियुक्तीचे वेळी आस्थापनेवर कनिष्ठ अभियंताचे पद उपलब्ध नसल्यामुळे नियुक्ती न करता ड्राप्समन या पदावर नियुक्ती करण्यांत येत आहे. असे लिहीलेले आहे.

श्री.अनाप, कनिष्ठ अभियंता यांची कोल्हापूर महानगरपालिका यांची अहमदनगर महानगरपालिका येथे कनिष्ठ अभियंता नेमणुक करण्यासाठी मा.महानगरपालिकेच्या सभेपुढे प्रस्ताव का आणण्यांत आला नाही. या बाबत विचारणा केली असता यावर सहा. आयुक्त यांनी खुलासा केला की, याबाबतचा ठराव झालेला आहे. व महाराष्ट्र शासनानेही यास मंजूरी दिलेली आहे.

पद भरती करतांना मे.कोर्टातुन लगेच कॅवेट दाखल करण्यांत आले यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की, काही तक्रारी असल्यामुळे भरती बाबत काही व्यत्यय येवु नये म्हणुन याबाबत कॅवेट दाखल करण्यांत आलेले होते.

मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, या बाबतची संपुर्ण भरती प्रक्रीया चुकीची आहे. भरती बाबत एका रात्रीतुन निवड समितीची यादी नोटीस बोर्डावर लावण्यात आली व ती यादी वाचतांना यादी गुणानुक्रमानुसार व आसनक्रमांकानुसार वाचावी असे नमुद करण्यांत आले.

यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की, याबाबत दुरुस्ती करुन यादी बोर्डावर लावलेली होती.

मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की, निवडी बाबतची प्रत्येक प्रक्रीया चुकत गेली आहे. यामध्ये उमेदवारांचे क्वालीफिकेशन, मनपा जाहीर नोटीस इ. यामुळे लोकांवर अन्याय झाला असल्याने मी महासभेला विनंती करतो की, सदरची प्रोसिजर पुर्ण पणे रद्द करावी व या निवडीस माझा पुर्णपणे विरोध आहे.

मा.श्री.भानुदास कोतकर :- महानगरपालिके मध्ये अवघे चार अभियंते आहेत शहरात विकास कामे करतांना व त्याचे एस्टीमेट तयार करतांना या अभियंत्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. नविन अभियंत्यांची भरती केल्यामुळे शहर विकासाला चालना मिळेल. ही भरती कायदेशिर की बेकायदेशिर या बाबत खोलात न शिरता शहर विकास कामास चालना मिळेल हा हेतु डोळयासमोर ठेवुन विरोधकांनी या भरती प्रक्रीयेला विरोध न करता सर्वानुमते मंजुरी द्यावी असे सुचविले. जाहीरात देवुन सुध्दा महानगरपालिकेला लोक भेटत नाहीत. टेंम्पररी इंजिनियर काम करीत नाहीत. सध्या इंजिनियर लोकांना बाहेरच्या क्षेत्रामध्ये ३५ ते ४० हजार रुपये पगार मिळतो त्यामुळे इंजिनियर महानगरपालिकेकडे हजर होत नाहीत. त्यामुळे या विषयास मंजुरी द्यावी असे सुचविले.

त्यानंतर सभागृहात एकदम मोठा गोंधळ होवुन सर्वश्री विनित पाउलबुध्दे , अशोक कानडे, अभय आगरकर , बहिरनाथ वाकळे, कृ.द.जाधव हे सर्व सन्माननीय सदस्य एकीकडे एकदम उभे राहुन विषय मंजुर करण्यास आमचा विरोध आहे असे सुचवित असतांनाच दुसरीकडे मा.महापौर यांनी " सदर विषय मंजुर करण्यांत येत असुन आजच्या सभेचे कामकाज संपविण्यात येत आहे." असे म्हटले व त्यानंतर राष्ट्रगीतास सुरूवात झाली.

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १ | मागील दिनांक १०-१०-२००७ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव. |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या नविपेठ दवाखाना येथील प्रयोगशाळेमध्ये सेमी ॲटो ॲनालायझर मशिनवर करावयाच्या नविन तपासण्या व त्यांचे दर अखेर मंजुरीसाठी मा.महासभेपुढे निर्णयास्तव ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | प्रभाग क्र.२१ मधील कै.उ.रा.बोगावत मार्गावरील बालाजी मंदिर परिसरात श्री. बालाजी मंदिर चौक व संगम चौक ते धरती चौक दरम्यान रस्त्यास महावीर प्रभुजी मार्ग असे नामकरण करणे बाबत मा.श्री.बोरा किशोरकुमार , नगरसेवक, श्री.संजय चोपडा , नगरसेवक , श्रीमती.मंगल गुंदेचा , नगरसेविका यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | एकात्मिक शहर विकास योजना, अहमदनगर (सुधारित ) सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुकाने / गाळे / कार्यालये / भाजीचे ओटे यांचे भाडेमूल्य ठरविणे बाबत ऑफिसचा रिपोर्ट. |
| ६ | महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अनधिकृत व नियमबाहय बांधकामे दंड / प्रशमन शुल्क आकारून नियमित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ७ | श्री.किसन शिवाजी भांगरे, मलेरिया बिगारी यांनी त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ प्रमाणे केलेल्या शिक्षेविरूध्द केलेल्या अर्जावर ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव |
| ८ | श्री.काशीनाथ नारायण धिंदले , मलेरिया बिगारी यांनी त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ प्रमाणे केलेल्या शिक्षेविरूध्द केलेल्या अर्जावर ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव |
| ९ | दि.७-१२-२००६ चे शासन निर्णयानुसार सिस्टीम मॅनेजर व संगणक प्रोग्रॅमर या पदावर पदोन्नती देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १० | अहमदनगर महानगरपालिका सि.स.नं. १००/१ औरंगाबाद रोड येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे, सुधारित नकाशे व आराखडे , सुधारित किंमत यांना मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११ | आस्थापना कायम सुचीवरील कनिष्ठ अभियंता / सहाय्यक नगररचनाकार ही पदे खुल्या / अनुशेषांतर्गत सरळसेवेने भरती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

**ठराव क्रमांक १ दिनांक १५-०३-२००८.**

विषय : मागील दिनांक १०-१०-२००७ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

-- * --

ठराव : अ) इतिवृत्त कायम करण्यांत येत आहे.

ब) सभागृहाचा कल पाहता महानगरपालिके मधील बिगारी या पदाचे बाबत खाते निहाय माहिती घेवुन ज्या विभागास बिगारी या पदाच्या कामगारांची आवश्यकता आहे व ज्या विभागात अतिरिक्त कामगार असल्याबाबत प्रशासनाची खात्री होत असेल त्यानुसार प्रभारी आयुक्त यांनी सदरची माहिती ३१ मार्च २००८ अखेर माहिती संकलीत करणे बाबत कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.

अनुमोदक : मा.श्री.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**ठराव क्रमांक ३  दिनांक १५-०३-२००८.**

विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या नविपेठ दवाखाना येथील प्रयोगशाळेमध्ये सेमी ॲटो ॲनालायझर मशिनवर करावयाच्या नविन तपासण्या व त्यांचे दर अखेर मंजुरीसाठी मा.महासभेपुढे निर्णयास्तव ऑफिस रिपोर्ट.

-- * --

ठराव : ऑफिस रिपोर्ट नुसार व सभेमध्ये साधक - बाधक झालेल्या चर्चेनुसार नविपेठ दवाखाना येथील प्रयोग शाळेमध्ये सेमी ॲटो ॲनालयझर मशिनवर तपासणी करणे ही रूग्ण सेवा प्रथमतः तातडीने सुरू करावी. कार्यालयीन प्रस्तावानुसार फी आकारणी करणेस मानयता देण्यात येत आहे. डॉ.टेकवानी , वैद्यकिय अधिकारी यांचे सुचनेनुसार रूग्णांची गैरसोय होवु नये यास्तव सध्या कार्यरत लॅब टेक्निशियन यांचेकडून सदरचे काम सुरू करणेत यावे मात्र सदरच्या वैविध्यपुर्ण कामाकरीता तंत्रज्ञाचे नविन पद निर्माण करण्योच दृष्टीने प्रशासनाने संपूर्ण माहितीस सविस्तर प्रस्ताव तयार करून महासभेपुढे मंजुरीस्तव सादर करावा.

सुचक : मा.श्री.

अनुमोदक : मा.श्री.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**ठराव क्रमांक ४  दिनांक १५-०३-२००८.**

विषय : प्रभाग क्र.२१ मधील कै.उ.रा.बोगावत मार्गावरील बालाजी मंदिर परिसरात श्री. बालाजी मंदिर चौक व संगम चौक ते धरती चौक दरम्यान रस्त्यास महावीर प्रभुजी मार्ग असे नामकरण करणे बाबत मा.श्री.बोरा किशोरकुमार , नगरसेवक, श्री.संजय चोपडा , नगरसेवक , श्रीमती.मंगल गुंदेचा , नगरसेविका यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

-- * --

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.

अनुमोदक : मा.श्री.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**ठराव क्रमांक ५  दिनांक १५-०३-२००८.**

विषय : एकात्मिक शहर विकास योजना, अहमदनगर (सुधारित ) सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील दुकाने / गाळे / कार्यालये / भाजीचे ओटे यांचे भाडेमूल्य ठरविणे बाबत ऑफिसचा रिपोर्ट.

-- * --

ठराव : ऑफिस रिपोर्ट व सभेमध्ये झालेली साधक - बाधक चर्चा त्यानुसार ठरविण्यात येते की, मालमत्ता कर व इतर आवश्यक कर यांची आकारणी महानगरपालिकेने करणे बाबत कार्यवाही स्वतंत्ररित्या न करता प्रती वर्षी या करांची गाळे धारकांस अदा करावी लागणारी रक्कम व गाळयाचे होणारे भाडे याचा एकत्रित हिशोब करून सुधारित भाडे रक्कम ठरावावी. तसेच मा.केंद्र शासनाच्या UIDSSMT मधुन सदरचा प्रकल्प उभारला गेला आहे याचा देखील विचार करून त्यातील मर्यादा लक्षात घेवुन ही सभा मान्यता देत आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

सुचक : मा.श्री.

अनुमोदक : मा.श्री.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**ठराव क्रमांक ६  दिनांक १५-०३-२००८.**

विषय : महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अनधिकृत व नियमबाहय बांधकामे दंड / प्रशमन शुल्क आकारून नियमित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

-- * --

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर . प्रशासनाने अशा प्रकरणांची संपुर्ण तपासणी करूनच व मा.शासनाने याबाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्व प्रणाली अंमलात आणुनच दाखल होणारे प्रकरणा बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी. आवश्यकतेनुसार प्रकरणामध्ये महानगरपालिका मानद कायदे तज्ञांचे मार्गदर्शन घेत जावे. तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार अशा प्रकारच्या प्रकरणांच्या आलेल्या व प्रकरण मंजुर करून अथवा कुठली कार्यवाही प्रकरण परत देताना करण्यात आली याबाबतचा आवक जावक क्रमांक व दिनांक न चुकता नमुद करावा. त्याबाबतच्या नोंदी ठेवण्यात याव्यात.

सुचक : मा.श्री.

अनुमोदक : मा.श्री.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**ठराव क्रमांक ७ दिनांक १५-०३-२००८.**

विषय : श्री.काशीनाथ नारायण धिंदले , मलेरिया बिगारी यांनी त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ प्रमाणे केलेल्या शिक्षेविरूध्द केलेल्या अर्जावर ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव

-- * --

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर . नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. अभय आगरकर

अनुमोदक : मा.श्री. कैलास गिरवले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**ठराव क्रमांक ८ दिनांक १५-०३-२००८.**

विषय : श्री.काशीनाथ नारायण धिंदले , मलेरिया बिगारी यांनी त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ प्रमाणे केलेल्या शिक्षेविरूध्द केलेल्या अर्जावर ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव

-- * --

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर . नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. अभय आगरकर

अनुमोदक : मा.श्री. कैलास गिरवले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## ठराव क्रमांक ९ दिनांक १५-०३-२००८.

विषय : दि.७-१२-२००६ चे शासन निर्णयानुसार सिस्टीम मॅनेजर व संगणक प्रोग्रॅमर या पदावर पदोन्नती देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

-- * --

ठराव : ऑफिस रिपोर्ट व साधक - बाधक झालेल्या चर्चेनुसार मा.शासन निर्णय क्रमांक मनपा १००५ / प्र.क्र.६१ नवि २४ मंत्रालय, मुंबई ३२ ७ डिसेंबर २००६ व ऑफिस रिपोर्ट नुसार सिस्टीम मॅनेजर व संगणक प्रोग्रामर या पदावर पदोन्नती देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी. तसेच मा.शासन निर्णय दि.७-१२-२००६ व पदोन्नती आदेश प्राप्तता या कालावधीमधील वेतन तफावती बाबतचा फरक व इतर नियमाप्रमाणे होणारी देयके अदा करण्यांस देखील ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजुर.

ब) श्री.सुरेश इथापे , सिव्हील ड्रॉप्समन यांनी अनेक वर्ष महानगरपालिकेकडे केलेल्या कामाचा विचार करता तसेच मा.न्यायालयाकडे त्यांनी केलेल्या तक्रारींचा देखील विचार करता तसेच यापुर्वी वेळोवेळी सभेमध्ये झालेल्या चर्चा विचारात घेता श्री.इथापे यांना सिव्हील ड्रॉप्समन या पदावरून कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती देण्यात यावी. तसेच श्री.इथापे यांनी मा.न्यायालयातील केस काढले नंतर त्यांना पदोन्नती आदेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजुर.

सुचक : मा.श्री.

अनुमोदक : मा.श्री.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## ठराव क्रमांक १० दिनांक १५-०३-२००८.

विषय : अहमदनगर महानगरपालिका सि.स.नं. १००/१ औरंगाबाद रोड येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे, सुधारित नकाशे व आराखडे , सुधारित किंमत यांना मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

-- * --

ठराव : प्रशासकीय इमारतीचे बांधकाम मे.सहकार एजन्सी यांनी रूपये १.२५ कोटी रूपयाचे काम वेळेमध्ये व चांगल्याप्रमाणे केले असल्याने उर्वरित इमारतीचे काम त्यांचेकडून करून घेण्यात येईल. सदर काम त्यांनी सन २००६-२००७ चे दराने केलेले आहे. उर्वरित काम चालु दरसुचीनुसार ( सन २००७-०८ ) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुधारित किंमत ४०३ लक्ष रूपयास मान्यता देण्यात येत आहे. तसेच नकाशे व आराखडे यांना मान्यता देण्यात येत आहे. तसेच बोट हाउसचे काम हाती घेण्यास व उर्वरित वास्तुशास्त्रीय कामासाठी मे.कांकरिया अँण्ड असो.यांचे नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता असतांनाचे सिमेंट व स्टील दर व आजचे म्हणजेच मार्च २००८ चे दर यामधील फरक देण्यासही ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजुर.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.

अनुमोदक : मा.श्री.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## ठराव क्रमांक ६ दिनांक १५-०३-२००८.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट व सभेमध्ये साधक -बाधक चर्चा यांचा विचार करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. ऑफिस रिपोर्ट मंजुर . प्रशासनाने अशा प्रकरणांची संपुर्ण तपासणी करून व मा.शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. आवश्यकतेनुसार दाखल प्रकरणांबाबत महानगरपालिका मानद कायदे तज्ञांचे मार्गदर्शन घेत जावे.दिनांक १-०४-२००९ पासुन पुढे दाखल होणा-या प्रस्तावित दरात १० % वाढ करणेस ही सभा मान्यता देत आहे.

२. पुर्वीच्या काळात अनेक बांधकाम व्यावसायिकांनी तळघरात स्टोअर असा उल्लेख करून प्रत्यक्षात दुकाने म्हणुन त्यांची विक्री केली आहे. व जागेवर दुकाने सुरू आहेत. ही दुकाने नियमाकुल करता येतील किंवा कसे याबाबत शासनाचे मार्गदर्शन घ्यावे. व त्यानंतर तसा प्रस्ताव मंजुरीसाठी पुन्हा मा.महासभेस सादर करावा. मध्यंतरीच्या काळात अशी दुकाने नियमाकुल करण्यात येवु नयेत.

३. शहरातील काही वैद्यकिय व्यावसायिकांनी रहिवासी वापरासाठी महानगरपालिकेची परवानगी घेवुन प्रत्यक्षात त्यांचा इस्पितळासाठी वापर सुरू केला आहे. ही बाब योग्य नाही. मात्र शहरातील नागरिकांना अशा इस्पितळांमुळे चांगली वैद्यकिय सुविधा मिळत असल्याने अशा वापरातील बदल कलम १४३ अन्वये नियमाकुल करता येईल किंवा कसे याबाबत प्रस्ताव महानगरपालिकेच्या शिफारशीसह शासनास सादर करावा. व शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यावर तसा प्रस्ताव मा.महासभेस मंजुरीसाठी सादर करावा.

सुचक : मा.श्री.
अनुमोदक : मा.श्री.
ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.